
अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड




www.surajyadigital.com | रविवार, दि.२९ जानेवारी २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : १२३ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

# उड्डाणपुलाने केली १४ हरणांची शिकार

सुराज्य/सोलापूर

**हरणाची शिकार करणे हा कायद्याने गुन्हा आहे. हा गुन्हा करणाऱ्या फिल्मस्टारनाही लवकर बेल न मिळाल्यामुळे जेलची हवा खावी लागली आहे. शनिवारी सायंकाळी एक नव्हे दोन नव्हे तर तब्बल १४ हरणांची शिकार करण्यात आली आहे. शिकार करणारे कोणी शिकारी नसून ही शिकार केली आहे उड्डाणपुलाने. पाठीमागे लागलेल्या कुत्र्याला घाबरून पळत सुटलेला हरणांचा कळप थेट उड्डाणपुलावरून खाली कोसळल्यामुळे एकाचवेळी १४ हरणांचा जीव गेला आहे.**

सोलापूर-विजापूर बायपास रोडवर देशमुख वस्तीनजीक ही घटना घडली आहे. उड्डाणपुलाच्या खाली असलेल्या सर्व्हिस रोडवर अस्ताव्यस्त पडलेले १४ हरणांचे मृतदेह, डांबरी रस्त्यावर लालभडक रक्ताचा सडा आणि बघ्यांची तोबा गर्दी आणि हळहळ करणारे बघे असे चित्र शनिवारी सायंकाळी पाहण्यास मिळाले.






## उडी मारली अन् मृत्यूने कवटाळले

विजापूर-सोलापूर बायपास रोडवरील देशमुखवस्ती परिसरात नेहमीच हरणांची वर्दळ असते. कळपाकळपाने हरणांचा या परिसरात वावर असतो. शनिवारी सायंकाळच्या सुमारास असाच एक हरणांचा कळप या परिसरात फिरत होता. त्यावेळी भटक्या कुत्र्यांनी हरणांच्या कळपावर चाल केली. तेव्हा हरणांचा तो कळप पळत सुटला. पुढे हरणांचा कळप आणि पाठीमागे भटकी कुत्री असा पाठलाग सुरू होता. पळणाऱ्या हरणांसमोर हा बायपास रोडवरील उड्डाणपूल होता. त्यावरून रस्ता ओलांडताना हरणांचा हा कळप सुमारे तीस फूट खाली सर्व्हिस रोडवर कोसळला आणि त्याच ठिकाणी १४ हरणांना मृत्यूने कवटाळले.

## उड्डाणपुलावर जाळी बसवण्याची मागणी



दरम्यान या परिसरात अशा घटना वारंवार घडत आहेत. त्यात मुक्या प्राण्यांना जिवास मुकावे लागत आहे. असे प्रकार टाळण्यासाठी या परिसरातील उड्डाणपुलांवर लोखंडी जाळी बसवण्याची मागणी यापूर्वी अनेकवेळा वन्यप्रेमींकडून करण्यात आली होती. मात्र वनविभागाने त्यासंदर्भात कोणतीच दखल घेतलेली नाही. आता या घटनेनंतर पुन्हा एकदा जुनीच मागणी नव्याने पुढे आली असून आता तरी वनविभाग आणि रस्ते विभाग याकडे लक्ष देईल का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

## वनप्रेमींकडून संताप

मागच्या वर्षी याच देशमुख वस्तीजवळ अशाच पध्दतीने दोन हरणांचा मृत्यू झाला होता. त्यावेळी वाईल्डलाईफ काँझर्वेशन असोशिएशन, सोलापूर या पर्यावरणप्रेमी संस्थेकडून प्राण्यांचे मुखवटे परिधान करून अनोख्या पद्धतीने वन खात्याला निवेदन देण्यात आले होते. परंतु वनखात्याने कोणतीही उपाययोजना केलेली नसल्यामुळे पर्यावरणप्रेमींतून संताप व्यक्त केला जात आहे.

# उपोषणास बसलेल्या वनमजुरांपैकी एकाची प्रकृती बिघडली

### सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल

सुराज्य/मोहोळ

वन मजुरांचे थकित वेतन मिळावे यासाठी मोहोळ तहसिल कार्यालय यासमोर मागील चार दिवसांपासून उपोषणास बसलेल्या सात मजूरांपैकी एकाची प्रकृती खलावल्याने त्यास तातडीने सोलापूर येथील शासकिय रुग्णालयात हलवण्यात आले आहे

सामाजिक वनीकरण विभाग मोहोळ येथील वनक्षेत्रपाल यांचेकडे १९८७ पासून रोजंदारीवर मोहोळ तालुक्यातील ७ वनमजूर हे काम करत आहेत. त्यांना नियमित सेवेत सामावून घेण्यात यावे यासाठी त्यांचे केस कोर्टामध्ये चालू असून जोपर्यंत केसचा निकाल लागत नाही तोपर्यंत त्यांना कमी करण्यात येवू नये ही त्यांची मागणी दाखल करण्यात आली आहे. त्यानुसार २०२१ पासून मोहोळ येथे वनक्षेत्रपाल म्हणून कार्यरत असलेले वनक्षेत्रपाल रघुनाथ कांबळे यांनी त्यांचे जाणीवपूर्वक वेतन रोखून धरलेले आहे. ऑगस्ट २०२१ एप्रिल ते २०२२ पर्यंत वेतन देण्याचा आदेश असताना सदरचे



वेतन जाणीवपूर्वक देण्यात आलेले नाही असे उपोषणास बसलेल्या मजुरांचे म्हणणे आहे. सद्य परिस्थितीमध्ये महिन्याला २६ दिवस रोजंदारीचे भरूनही १३ दिवसाची हजेरी लावली जाते. इतर बोगस मजूर कामावर नसताना त्यांच्या नावे हजेरी लावलेली आढळून येते असे मजुरांचे म्हणणे आहे. त्यामुळे जे प्रामाणिकपणे काम करतात त्यांचा शारीरिक व मानसिक छळ वनक्षेत्रपाल यांचे कडून केला जात आहे.

यासाठी या प्रकरणाची चौकशी करण्यात यावी व आम्हाला न्याय मिळावा या मागणीसाठी ते २६ जानेवारी पासून मोहोळ तहसील कार्यालयासमोर उपोषणाला बसले आहे. उपोषणास बसलेल्या ७ वनमजुरापैकी गजेंद्र शिवाजी मांडवे यांची प्रकृती चौथ्या दिवशी एकदम खालावली असल्यामुळे त्यांना मोहोळच्या ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार करून तातडीने सोलापूर येथील शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या आंदोलनास मनसे नवनिर्माण सेनेच्या शेतकरी आघाडीचे जिल्हा अध्यक्ष महादेव माढरे विष्णूपंत गायकवाड यानी रात्री उशीरा वन मजूरांची भेट घेवून त्यांच्या आंदोलनास पाठींबा दिला आहे.

# शहरात विविध कारणावरून आठजणांनी केले विषप्राशन

सोलापूर : शहर आणि जिल्हा परिसरात विविध कारणावरून २ महिलासह ८ जणांनी विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केल्याची नोंद शासकिय रुग्णालयात झाली आहे. लक्ष्मण श्रीमंत पुजारी (वय २६ रा.औज ता.दक्षिण सोलापूर) याने शेतात अज्ञात कारणावरून विष प्राशन केले. त्याला मंद्रूप येथे प्राथमिक उपचार करून (आई) निलावती यांनी रुग्णालयात दाखल केले. शिवा सुरेश जाधव (वय २२ रा.मिरजगी ता. अक्कलकोट)याने शुक्रवारी सायंकाळी शेतात दारूच्या नशेत विष प्राशन केले. त्याला अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरात दाखल करण्यात आले.



स्वानंद दत्तात्रय सपकाळ (वय २५ रा.चिंचोळी ता.माढा) याने शुक्रवारी सायंकाळी शेतात अज्ञात कारणावरून विष प्राशन केले. त्याला माढा येथे प्राथमिक उपचार करून (आई) मंदाकिनी यांनी सोलापुरात दाखल केले. विजय भिमराव इंगळे (वय ५०, रा.कुरुल, ता.मोहोळ) याने शुक्रवारी रात्री अज्ञात कारणावरुन शेतात विषप्राशन केले. त्याला रामचंद्र (भाऊ) यांनी सोलापूरात दाखल केले. रवी नागनाथ कोळी (वय २५ रा.अंकलगी ता. अक्कलकोट) याने शनिवारी सकाळी राहत्या घरात विष प्राशन केले. त्याला सुभाष कोळी (मामा) यांनी सोलापूरात दाखल केले.ममता राजू बुगडी (व २८ रा. घरकुल कुंभारी, ता.दक्षिण सोलापूर) हिने घरात फिनेल प्राशन केली.

तिला भाऊ इरण्णा गादाम यांनी शासकिय रुग्णालयात दाखल केले. सोनू गजेंद्र गायकवाड (व २२ रा.अंकोली ता.मोहोळ) यांनी शनिवारी दुपारी दारूच्या नशेत विष प्राशन केले. त्याला रवी भाऊ यांनी सोलापूरात दाखल केले. चारुशिला मनोज शिंदे (वय ३० रा.बुधवार पेठ) हिने घरगुती अडचणीतून विष प्राशन केली. तिला भैय्यासाहेब कांबळे (भाऊ) यांनी रुग्णालयात दाखल केले. याशिवाय पूजा संजय जमखंडी (वय २२ रा.विजापूर रोड) या विवाहितेने दूध समजून उंदीर मारण्याचे विषारी द्रव प्राशन केली. तर आशा दादाराव कोळेकर (वय ३५ रा.कोळेगाव ता.मोहोळ) हिने शनिवारी सकाळी नजरचुकीने झाडावर फवारणीच विषारी द्रव चुकून प्राशन केली. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# पठाण चित्रपटाचे पोस्टर फाडणाऱ्या अकरा जणांवर गुन्हा दाखल

सुराज्य/सोलापूर



उमा चित्रपट गृहासमोर लावलेले 'पठाण' या हिंदी चित्रपटाचे पोस्टर फाडल्या प्रकरणी ११ जणांविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना दि.२७ जानेवारी रोजी दुपारी सव्वा बारा वाजण्याच्या सुमारास उमा चित्रपट गृहासमोर घडली.

याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल सचिन सुधाकर कुलकर्णी यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून रवी उर्फ राम सिद्राम गोणे, सिद्राम श्रीहरी चरकुपल्ली, प्रमोद अंबादास यलगेटी, नागेश प्रभाकर बंडी, सुधीर ऊर्फ सुधाकर महादेव बहिरवाडे, सागर रमेश सिध्दुल, राजु आनंद चिप्पा, अंबादास लक्ष्मण गोरंटला, प्रशांत प्रेमचंद परदेशी, आनंद विठ्ठलराव मुसळे, शितल गोपीकिशन परदेशी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस कॉन्स्टेबल पवार हे करीत आहेत.

# घरफोडी करणाऱ्या सराईत गुन्हेगारासह सोनारास अटक

### तब्बल सात वर्षानंतर गुन्हा उघडकीस

### तीन तोळ्याचे सोन्याचे दागिने जप्त

सोलापूर : शहरात घरफोडी, चोरीसंदर्भात विविध पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल असलेल्या सराईत गुन्हेगारासह एका सोनारालाही अटक करून शहर गुन्हे शाखेच्या पथकाने तीन तोळ्याच्या सोन्याचे दागिने जप्त केले आहेत. या अटकेमुळे तब्बल सात वर्षांपूर्वी झालेली घरफोडी उघडकीस आली आहे.

शशिकांत अनिल राक्षे (रा. उस्मानाबाद) असे अटक करण्यात आलेल्या सराईत गुन्हेगाराचे नाव आहे. घरफोडीचे गुन्हे करणारा सराईत गुन्हेगार शशिकांत राक्षे हा गड्डायात्रेत फिरत असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांना मिळाली होती. त्यावरून सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन निरगुडे यांच्या पथकाने पाळत ठेवून राक्षे याला ताब्यात घेऊन अटक केली. त्याने सन २०१६ मध्ये विजापूर नाका पोलीस ठाण्याच्या हद्दीत जुने संतोष नगर याठिकाणी घरफोडी केल्याची कबुली दिली.



दरम्यान शशिकांत राक्षे याने घरफोडी वेळी चोरलेले सोन्याचे दागिने बीड येथील सोन्याचे व्यापारी गजानन ऊर्फ रिंकू शेठ बालाजीराव बोकन (रा.दबडगावकर कॉलनी, माजलगाव,जिल्हा बीड) यांना विक्री केल्याची माहिती दिली.त्यामुळे बोकन यास अटक करण्यात आली असून दोघांनाही न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे. त्यांच्याकडून तीन तोळे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले आहेत. ही कामगिरी गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन निरगुडे, पोलीस हवालदार दिलीप भाळशंकर, वाजिद पटेल, पोलीस नाईक योगेश बरडे,पोलीस कॉन्स्टेबल संजय साळुंखे यांनी पार पाडली.


# राखी सावंतच्या आईचे निधन

सोलापूर : बिग बॉस मराठी फेम अभिनेत्री राखी सावंतची आई जया सावंत यांचे निधन झाले आहे. राखीची आई जया सावंत या गेल्या अनेक दिवसांपासून टाटा मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटलमध्ये दाखल होत्या. त्या कॅन्सर आणि ब्रेन ट्यूमरशी लढत होत्या.

राखीच सावंतचा पती आदिल खान दुर्रानी यांनी जया सावंत यांच्या निधनाच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे. अनेक दिवसांपासून अभिनेत्री राखी सावंत तिच्या आईला रुग्णालयात भेटायला जाताना दिसत होती. राखी सावंतच्या आईच्या प्रकृतीसाठी तिचे चाहते सतत प्रार्थना करत होते.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



ही अपघातांची मालिका, आपण तर फुटपाथ वर राहतोय!

कल्याण
137-15-230

### महापालिका आयुक्तांचा खळबळजनक आदेश

# सार्वजनिक आरोग्य अभियंता धनशेट्टी यांना तडकाफडकी केले कार्यमुक्त

■ प्रशासकीय व राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चेला आले उधाण

सुराज्य/सोलापूर

महापालिकेतील आवेक्षक व सहाय्यक अभियंत्यांचे खांदेपालट करतानाच महापालिकेचे सार्वजनिक आरोग्य अभियंता संजय धनशेट्टी यांना तडकाफडकी कार्यमुक्त करण्याचा आदेश महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांनी काढला आहे. यामुळे खळबळ उडाली आहे.

आरोग्य अभियंता पदाचा पदभार कुणाला द्यायचा हे स्पष्ट न केल्याने महत्त्वाचे हे पद तूर्तास तरी रिक्त झाले आहे. दुहेरी जलवाहिनीचे काम वादाच्या भोवऱ्यात सापडले असतानाच कार्यमुक्तीच्या या निर्णयामुळे प्रशासकिय व राजकिय वर्तुळात उलट-सुलट चर्चेला उधाण आले आहे. महापालिकेचे सार्वजनिक आरोग्य अभियंता हे पद पाणीपुरवठा व ड्रेनेज व्यवस्थेची निगडित आहे. महापालिकेचा हा विभाग अतिशय महत्त्वाचा मानला जातो. आरोग्य अभियंता संजय धनशेट्टी यांना शासनाने महापालिकेत या पदासाठी मुदतवाढ दिली नाही. यामुळे काल महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांनी धनशेट्टी यांना सार्वजनिक आरोग्य अभियंता व तांत्रिक अधिकारी पदावरून कार्यमुक्त केल्याचे आदेश काढले आहेत. हे आदेश काढत असतानाच ऐन उन्हाळ्याच्या तोंडावर हा बदल केला आहे.



या आरोग्य अभियंता पदाचा चार्ज कुणाकडे द्यायचा आहे? या आदेशात नमूद केलं नाही. यामुळे हे महत्त्वाचे पद तूर्तास तरी रिक्त असल्याचे मानले जात आहे. पर्यायी व्यवस्था कुणाकडे सोपविणार? याकडे आता लक्ष लागले आहे.काल महापालिका आयुक्त शितल तेली उगले यांनी महापालिकेतील पाच आवश्यक आणि चार सहाय्यक अभियंत्यांच्या बदल्या केल्या. त्याचबरोबर आरोग्य अभियंता पदावर कार्यरत असलेले संजय धनशेट्टी यांना कार्यमुक्त करण्याचे आदेश काढले. यामुळे महापालिका प्रशासकिय वर्तुळात खळबळ उडाली आहे. दरम्यान महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील अभियंता माशाळे यांच्याकडे या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात येणार असल्याची चर्चा आहे.

## तत्कालीन सीईओ ढेंगळे-पाटील यांच्यानंतर आरोग्य अभियंता धनशेट्टी कार्यमुक्त!

स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशनचे तत्कालीन सीईओ त्रिंबक ढेंगळे - पाटील यांना शासनाने २५ नोव्हेंबर रोजी कार्यमुक्त केले होते. तत्पूर्वी एक दिवस अगोदर ढेंगळे-पाटील यांनी उजनी-सोलापूर समांतर जलवाहिनीचे काम थांबवण्याचे आदेश संबंधित लक्ष्मी कंपनीस दिले होते. त्यातच जुन्या पोचमपाड कंपनीने प्रस्ताव देऊन एन्ट्री केली. त्याचे तीव्र पडसाद उमटले होते. ढेंगळे - पाटील यांना नोटीस बजावण्याचे आदेशही पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले. त्यानंतर आता सोलापूर महापालिकेचे सार्वजनिक आरोग्य अभियंता संजय धनशेट्टी यांना महापालिका आयुक्तांनी तडकाफडकी कार्यमुक्त केले आहे. स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत समांतर जलवाहिनी व स्काडा प्रणालीसह पाणीपुरवठ्याच्या विविध योजना राबविण्यात येत असतानाच ही कार्यमुक्ती धक्कादायक मानली जात आहे. यामुळे प्रशासकीय व राजकीय वर्तुळात उलट - सुलट चर्चेला उधाण आले आहे. शासनाने मुदतवाढ दिली नसल्याने त्यांना कार्यमुक्त करण्यात आले आहे. परंतु तीन महिने अगोदर महापालिका प्रशासनाकडून शासनाला संबंधित अधिकारी यांची मुदत संपली असल्याचे कळविणे आवश्यक आहे. तसे न कळविता परस्पर कार्यमुक्त करण्याची घाई का करण्यात आली असा सवाल उपस्थित होत आहे.

# आजपासून भंडारकवठे येथे साधना कुटीत सत्संगाचे आयोजन

सुराज्य/सोलापूर

श्री. पीरमहासिद्धाच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या पुण्यभूमी भंडारकवठे येथे भारत पौणिमा यात्रेनिमित्त साधना कुटी या अध्यात्म केंद्रात दि. २९ जानेवारी ते ४ फेब्रुवारी पर्यंत १६व्या वार्षिक सत्संगाचे आयोजन करण्यात आले असून या सत्संगाची सुरुवात या शतकातील महान संत चालता बोलता देव म्हणून ख्याती प्राप्ती झालेले. लिंगैक्य प. पू. श्री. सिद्धेश्वर महास्वामीजी ज्ञानयोगाश्रम विजयपूर यांच्या स्मृतीस गुरुवंदनने होणार आहे. या कार्यक्रमास वडापूर, कुसूर, खानापूर, तेलगाव, हत्ताळी, हाल्लोळी, विठ्ठलवाडी, अंत्रोळी, सादेपूर, बाळगी, निंबर्गी, शंकरनगर, माळकवठे अशा कर्नाटक व महाराष्ट्रातील १६ दिंड्यांचा सहभाग असणार असून हनुमान मंदिर ते साधना कुटी पदयात्रेचे व गावप्रदक्षिणेचे आयोजन करण्यात आले आहे.



हे कार्यक्रम प. पू. श्री. सिद्धेश्वर महास्वामीजींचे परमशिष्य पू. श्री. अमृतानंद महास्वामीजी, बालगाव यांच्या दिव्य सानिध्यात पू. श्री. बाबूराव महाराज व्हनवार, श्री. शंकरलिंग महाराज हाल्लोळी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार असून सात दिवस चालणाऱ्या या सत्संग सोहळयात वेदमूर्ती श्री महांतेश हिरेमठ तद्देवाडी यांच्या अमृतवाणीने दररोज ५ ते ७ या वेळेत भव्य संगीत प्रवचन होणार आहे. ३ फेब्रुवारी रोजी साधना कुटीचे संस्थापक विजय बिज्जरगी लिखित 'हे विठ्ठला सावळ्या' भक्त काव्याचे प्रकाशन अ. भा. वारकरी मंडळाचे अध्यक्ष हभप श्री. सुधाकर इंगळे महाराज यांच्या हस्ते प. पू. श्री. ताराचंद महाराज रामतीर्थ, हभप श्री. बाळकृष्ण महाराज नंदेश्वर, हभप श्री. संजय पाटील महाराज सोलापूर, श्री चन्नवीर भद्रेश्वर सोलापूर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार असून याप्रसंगी हभप श्री. बाबूसिंग महाराज सादेपूर, हभप श्री. शेकप्पा विरसूर महाराज टक्कनळळी यांनी काशी पदयात्रा केल्याबद्दल विशेष सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी दररोज भजन, प्रवचन, आरती व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

# ज्ञानयोगी

**अन्य समवयस्क मुले खेळत असताना ते रामेश्वर मठात किंवा उसाच्या शेतात ध्यान करीत. पुढे त्यांनी अध्यात्माच्या मार्गाला जाण्याची दिशा निश्चित करून घर सोडले आणि मल्लिकार्जुन स्वामी यांच्या मठात ते दाखल झाले.**

जाती-धर्माचा कसलाही अभिनिवेश न बाळगता ज्ञानाचा उपयोग आचरणात आणणारे आणि ज्ञानप्रसार करणारे तुलनेने फारच कमी असतात. नुकतेच दिवंगत झालेले आध्यात्मिक गुरू सिद्धेश्वर स्वामी त्यापैकी एक.

उत्तर कर्नाटकात आणि महाराष्ट्रात त्यांचा मोठा शिष्यपरिवार होता. जाती-धर्म आणि पंथांच्या सर्व भिंती ओलांडून जगभरातील तत्त्वज्ञान सोप्या सरळ शब्दांत सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य त्यांनी केले. कोणत्याही एका धर्मात अडकून न राहिलेले सिद्धेश्वर स्वामी यांना 'वॉकिंग गॉड' अशी उपाधी लाभली होती. त्यांनी कधीही स्वत:ची जात किंवा धर्म सांगितला नाही. कन्नड, मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते.

साध्या, सोप्या आणि रसाळ भाषेतील त्यांच्या प्रवचनांना हजारोंची गर्दी होत असे. त्यांच्या प्रवचनांना देश विदेशातील सर्व धर्मांतील नागरिक आवर्जून उपस्थित राहात. बुद्ध, बसवेश्वर, येशू, महंमद अशा दार्शनिकांचे आणि क न्फ यु शि अ स स ह जगभरातील सर्व विचारांचे दाखले ते देत. अवघड वाटणारे विषय ते सर्वसामान्यांच्या भाषेत समजावून सांगत. त्यांचा जन्म विजयपूर (विजापूर) जिल्ह्यातील शेतकरी कुटुंबातील. सिद्धगोंडा ओगेप्पा पाटील हे त्यांचे मूळ नाव.

लहानपणीच वेदांत केसरी मल्लिकार्जुन महाशिवयोगी यांच्या प्रवचनांचा त्यांच्यावर प्रभाव पडला.



अन्य समवयस्क मुले खेळत असताना ते रामेश्वर मठात किंवा उसाच्या शेतात ध्यान करीत. पुढे त्यांनी अध्यात्माच्या मार्गाला जाण्याची दिशा निश्चित करून घर सोडले आणि मल्लिकार्जुन स्वामी यांच्या मठात ते दाखल झाले. कालांतराने तेथील उत्तराधिकारी म्हणून त्यांची निवड झाली आणि सिद्धेश्वर स्वामी असे नामकरण झाले. त्यांनी देशविदेशातील विविध तत्त्वज्ञानांचा अभ्यास केला.

विविध तत्त्वज्ञानांचा परामर्श घेणारी त्यांची वीसहून अधिक पुस्तके प्रसिद्ध आहेत. साध्या भाषेप्रमाणेच साधी राहणी हे त्यांचे वैशिष्ट्य होते.

ज्ञानयोग आश्रमातील एका छोट्याशा झोपडीमध्ये त्यांनी कायम वास्तव्य केले आणि आपल्या खोलीत पंखा किंवा पलंग अशा वस्तू कधी वापरल्या नाहीत. पाच वर्षांपूर्वी जाहीर झालेली 'पद्मश्री'ही त्यांनी नाकारली होती.

## पिलीव येथे बाळासाहेब यांची जयंती उत्साहात साजरी



पिलीव : माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे बाळासाहेब ठाकरे यांची जयंती उद्धव ठाकरे गटाच्यावतीने उत्साहात साजरी करण्यात आली. शिवसेना कार्यालयात शिवसेनेचे माजी जिल्हा उपप्रमुख अशोक घोंगडे, युवासेना तालुकाप्रमुख सुभाष काकडे, तालुका उपाध्यक्ष डॉ. निलेश कांबळे, विठ्ठलराव मदने-पाटील यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी दादासाहेब मदने, योगेश देशमुख, विशाल शेंडगे सवस्तान शिंदे, स्वप्निल सावळजकर, बाळू जामदार, मारुती कांबळे, संतोष जाधव, संजय पाटील, संजय रोकडे उपस्थित होते. यानंतर रक्तदान शिबीरात ७१ जणांनी सहभाग नोंदवला. याप्रसंगी युवासेना राज्य विस्तारक उत्तम आयवळे, जिल्हा प्रमुख गणेश इंगळे हे उपस्थित होते. यावेळी अशोक घोंगडे, सुभाष काकडे, निलेश कांबळे, माजी सरपंच अमोल मदने, भाजपचे राहुल मदने, कुमार लोखंडे, तानाजी लोखंडे आदी उपस्थित होते.

## आज लिंगायत शिवशिंपी समाज वधूवर परिचय मेळावा

सोलापूर : श्री मद्विरशैव शिवसंप्रदायक शिवशिंपी समाजाच्यावतीने रविवार दि. २९ जानेवारी अखिल भारतीय वीरशैव लिंगायत शिवशिंपी समाज वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे तसेच या समारंभात वीरशैव शिवशिंपी समाजातील अखिल भारतीय स्तरावरील समाजभूषण पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती राष्ट्रीय उपाध्यक्ष शिवशंकर चोळळे यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली. या मेळाव्याचे अध्यक्षस्थानी माजी पालकमंत्री आमदार विजयकुमार देशमुख असणार आहे.

या कार्यक्रमास डॉ. गुरुप्रसाद बसवराज पडसलगी हे स्वागताध्यक्ष असून सुनंदा मल्लिनाथ लोणी या कार्याध्यक्ष आहेत. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून जी. मल्लाप्पा (अभियंता बंगळुरु), राजू भुमकर (उद्योजक सोलापूर), महादेव चाकोते (माजी सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती सोलापूर), राजशेखर शिवदारे (चेअरमन स्वामी समर्थ सहकारी सूतगिरणी), माजी महापौर शोभा बनशेट्टी, लखनऊचे डीआयजी चन्नप्पा शिवशिंपी, बेळगावचे जीएसटी कमिशनर जगदीश गलगली, उद्योजक सुरेंद्र पडसलगी, उदगीरचे उद्योजक नागराज आंबेसंगे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच या कार्यक्रमास कर्नाटक, महाराष्ट्र व आंध्रप्रदेश आदी राज्यातील शिवशिंपी समाजाचे अध्यक्ष व इतर क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

## 'मन खुळ्यागत' प्रेमगीत होणार १४ रोजी रिलीज

सोलापूर : 'मन खुळ्यागत' हे प्रेम गीत येत्या १४ फेब्रुवारी रोजी रिलीज होणार असल्याची माहिती या गीताचे निर्माते लेखक व 'बड्डे आहे भावाचा फेम' पिंपरी चिंचवड येथील गायक शेखर गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत दिली. या गाण्याचे चित्रीकरण दक्षिण सोलापूर तालुक्यातील कुडल संगम येथे करण्यात आले असून यामध्ये वैभव जानराव व सिद्धी शिंदे यांचा अभिनय आहे. यापूर्वी आपण 'बड्डे आहे भावाचा' यासह अनेक गाणी केले असून आता 'मन खुळ्यागत' हे प्रेमगीत तयार केले आहे. एस. जी. ऑफिशियल म्युझिक यूट्यूब चॅनलवर हे गाणे दि. १४ फेब्रुवारीला रिलीज करण्यात येणार आहे तसेच ओटीटी प्लॅटफॉर्मवर हे गाणे दिसेल याची सोय करण्यात आल्याचे गायक शेखर गायकवाड यांनी सांगितले. पत्रकार परिषदेस अभिनेता वैभव जानराव, अभिनेत्री सिद्धी शिंदे, सचिन गंजी, अमोल वाघमारे, संतोष क्षीरसागर, निनाद चलवादी उपस्थित होते.

## डी. के. तर्फे सामुदायिक विवाह सोहळ्यासाठी नावनोंदणीचे आवाहन

सोलापूर : दरवर्षीप्रमाणे यंदाही विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच तथागत गौतम बुद्ध यांची जयंती व वैशाख पौर्णिमेचे औचित्य साधून येथील डी. के. मागासवर्गीय बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्यावतीने दि. ५ मे २०२३ रोजी अण्णाप्पा काडादी प्रशालेच्या मैदानावर सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष दशरथ कसबे यांनी पत्रकार परिषदेत दिली. सामुदायिक विवाह सोहळ्याचे हे १४ वे वर्ष आहे. या विवाह सोहळ्यात वधूवरांना कपडे, वधूस मनी मंगळसूत्र तसेच संसारोपयोगी साहित्य देण्यात येणार आहे. लोकांना कर्ज काढून विवाह करावे लागतात. त्यातून गोरगरीब लोकांना एक आधार व्हावा या उद्देशातून हा सोहळा दरवर्षी राबवला जातो. या विवाह सोहळ्यासाठी दि. २५ एप्रिलपर्यंत नाव नोंदणी करावे, असे आवाहन संस्थापक अध्यक्ष दशरथ कसबे यांनी केले आहे. पत्रकार परिषदेत धीरज माने, उत्तम कसबे, बापू सदाफुले, शेषराव शिरसट, सतीश वाघमारे, किरण डोळसे आदी उपस्थित होते.

# चित्रकला 'रंगसंवाद- २०२३'चे आज स्वेरीत आयोजन

सुराज्य/पंढरपूर

गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या गौरवशाली रौप्यमहोत्सवी वाटचालीच्या निमित्ताने शालेय विद्यार्थी व महाविद्यालयीन युवकांच्या ललित कलागुणांना वाव देण्यासाठी स्वेरीमध्ये येत्या रविवार, दि. २९ जानेवारी २०२३ रोजी 'रंगसंवाद- २०२३' या भव्य चित्रकला स्पर्धेचे आयोजन केले आहे,' अशी माहिती स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांनी दिली.

१९९८ साली स्थापन झालेल्या स्वेरी या शिक्षण संस्थेने विशेषत: ग्रामीण भागातील युवकांना तंत्रशिक्षणाची नवीन उर्जा देत स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी प्रेरणा दिली. याच श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट, पंढरपूर अर्थात स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूरचा ज्ञानदायी प्रवास आता २५ वर्षांचा होतो आहे. स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर या महाविद्यालयाच्या गौरवशाली रौप्य महोत्सवाकडे होत असलेल्या दमदार वाटचालीचे औचित्य साधून भव्य चित्रकला स्पर्धा 'रंगसंवाद' या उपक्रमाचे आयोजन केले आहे. प्राथमिक गटात इयत्ता पहिली ते चौथीमधील विद्यार्थी असणार आहेत. त्यांच्यासाठी 'माझे घर' हा विषय देण्यात आला आहे. किशोर गटात पाचवी ते सातवीमधील विद्यार्थी सहभागी होतील. त्यांच्यासाठी 'माझा आवडता उत्सव' हा विषय देण्यात आला आहे. कुमार गटात आठवी ते दहावीचे विद्यार्थी सहभागी होतील. प्रत्येक गटासाठी व प्रत्येक क्रमांकासाठी स्वतंत्र पारितोषिके देण्यात येणार असून अनुक्रमे प्रथम क्रमांकासाठी स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्र व रोख रु. पंधराशे, द्वितीय क्रमांक-स्मृतीचिन्ह, प्रशस्तीपत्र व रोख रु. एक हजार, तृतीय क्रमांकासाठी स्मृति चिन्ह, प्रशस्तीपत्र व रोख रु. पाचशे तर उत्तेजनार्थ दोन पारितोषिके असतील त्यात स्मृतिचिन्ह व प्रशस्ती पत्रक असे स्वरूप असणार आहे. हा कार्यक्रम स्वेरी अभियांत्रिकीच्या प्रांगणात होणार असून यासाठी संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख यांच्यासह विश्वस्त व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. अधिक माहितीसाठी स्वेरी अभियांत्रिकीच्या सांस्कृतिक विभागाचे प्रमुख प्रा. यशपाल खेडकर (मो. नं. ९५४५५५३६९९), डॉ. धनंजय चौधरी (मो. नं. ९८६०१६०४३१), प्रा. पोपट आसबे (मो. नं. ७८२१००४६४७) व प्रा. अनुराधा पाटील (मो. नं. ७०५७३७६०६४) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. यामध्ये सहभागी सर्व विद्यार्थ्यांना 'सहभाग प्रमाणपत्र' देण्यात येईल.

# वंचित बहुजन आघाडी व शिवसेना युतीचा अकलूजमध्ये आनंदोत्सव

सुराज्य/अकलूज

वंचित बहुजन आघाडी व शिवसेना यांची महाराष्ट्रात युतीची घोषणा उद्धव बाळासाहेब ठाकरे व प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांनी मुंबई येथे केली. या घटनेने तमाम महाराष्ट्रामध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. तसेच सर्वसामान्य नागरिकांमध्ये बऱ्याच दिवसांची इच्छा पूर्ण झाल्याचे वातावरण दिसून आले.



याचं पार्श्वभूमीवर अकलूज येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे शिवसेना व वंचित बहुजन आघाडीच्यावतीने या युतीचे स्वागत करीत मोठी फाटाक्याची अतिशबाजी व हलगीचा तालात घोषणाबाजी करत व एकमेकांना जिलेबी भरवून आनंद साजरा केला. यावेळी वंचितचे व शिवसेनेचे दोन्ही पक्षाचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. त्यावेळी वंचित बहुजन आघाडीचे माळशिरस ता. अध्यक्ष अभिजित गायकवाड, शिवसेनेचे ज्येष्ठ महादेव बंडगर (ग्राहक संरक्षण कक्ष जि. प्रमुख), शेखरभैय्या खिलारे (अकलूज शहरप्रमुख), स्वप्नील वाघमारे (युवासेना राज्य सचिव), गणेश इंगळे (युवासेना जिल्हा प्रमुख), नौशाद शिकलकर (जिल्हा उपाध्यक्ष), भैय्या राऊत (जुने कडवे शिवसैनिक), पांडुरंग केंगार (जिल्हा संघटक), रवी कांबळे (जिल्हा कार्यकारणी सदस्य), दत्ताभाऊ साळुंखे (उपतालुकाप्रमुख माळशिरस), विजय कोकणे, उमेश जाधव (शिवसेना उप. शहरप्रमुख अकलूज), विकास दळवी (तालुका संघटक), सागर वाघमारे (ता. संपर्कप्रमुख), सुनील कांबळे (अकलूज शहराध्यक्ष), मनोज जगताप (अकलूज शहर उपाध्यक्ष), सागर जगताप (शहर महासचिव) शंकर पाटील (शहर संघटक), सूनका जाधव (शहर संघटक), बाळासाहेब गायकवाड (प्रसिध्दी प्रमुख), मिलिंद मोरे (शिवसैनिक), सतीश कुलाळ (शिवसैनिक), सुरेश मोटे (श्रीपूर शहराध्यक्ष), करण कांबळे (शाखाप्रमुख युवासेना), किरण भांगे, शिवदत्त नामदास, विशाल गवळी, पप्पू पवार, शिवराम गायकवाड, आकाश पराडे, सुजित गायकवाड, सागर झेंडे, अजय निचळ, आदर्श गायकवाड, युवराज गायकवाड, अजय कांबळे, जय खरे इत्यादी वंचित बहुजन आघाडी, शिवसेना, युवासेना कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आभार युवा सेना अकलूज शहरप्रमुख शेखरभैय्या खिलारे, वंचित बहुजन आघाडी अकलूज शहराध्यक्ष सुनील कांबळे यांनी मानले.

# कुमठेत महिलांसाठी हळदी-कुंकू कार्यक्रम

सुराज्य/सोलापूर

**मकर संक्रातीनिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही माजी नगरसेविका प्रिया माने यांच्यावतीने महिलांसाठी हळदी-कुंकू आणि झिम्मा फुगडी कार्यक्रम नुकताच घेण्यात आला. या कार्यक्रमाला माजी नगरसेविका अनुराधा काटकर, परवीन इनामदार, शैलजा राठोड यांच्यासह सुमारे ५०० महिलांची उपस्थिती होती.**



महिला एकत्र याव्यात, परस्परांची सुख-दु:खांची देवाण घेवाण व्हावी, या हेतूने प्रिया माने यांच्या कुमठे (दिलीप नगर) येथील निवास्थानी दरवर्षी हा कार्यक्रम दरवर्षी आयोजित केला जातो. यंदा ५०० महिलांनी कार्यक्रमात सहभाग घेऊन या कार्यक्रमास एक वेगळी रंगत भरली.

यावेळी प्रिया माने यांनी पुष्प देऊन महिलांचे स्वागत केले. या कार्यक्रमाला नर्मदा व्होरडे, पार्वती गरड, मोहिनी बडवणे, संगीता अवताडे, स्वाती सपकाळ, संगीता बसुटे, अनिता सावंत, सुवर्णा पवार, अर्चना पवार, सुनीता शिनगारे, भारती अवताडे, शालन देठे, नागवेणी होनराव, शोभा धुम्मा, ललित भद्रशेट्टी, महानंदा मायनाळे, रेखा जम्मा, सारिका वाले, राजश्री बरबडे, गीता राठोड, जयश्री राठोड, सीताबाई राठोड, इंदुमती राठोड, सुनंदा वाघमारे, शैला चलवदे, सोनाली मसलखांब, शांता पुतळे, सुनंदा मठपती, वंदना म्हेत्रे, लक्ष्मी नागणसुरे, आरती फुलारी यांच्यासह महिला उपस्थित होत्या.

## घरात घुसून संसारोपयोगी साहित्य फेकले

सुराज्य/सोलापूर : किरकोळ कारणावरून घरात घुसून संसारोपयोगी साहित्य रस्त्यावर फेकून हाताने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी दहा जणांविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी वनिता नरसय्या दासरी (वय-२६, रा. सत्य साईनगर, लोकसेवा शाळेसमोर) यांनी सदर बाजार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

त्यांच्या फिर्यादीवरून दीपक निंबाळकर, चिरंजीव निंबाळकर, अंबादास निंबाळकर, प्रमिला मच्छिंद्र निंबाळकर, अनिता सिद्राम निंबाळकर, सोनाली चिरंजीव निंबाळकर, नंदा निंबाळकर, वंदना निंबाळकर, दीपक निंबाळकर व त्यांची सावत्र आई (नाव पत्ता माहीत नाही) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी यांच्या घराशेजारी राहणारे वरील संशयित आरोपी यांनी संगनमत करून एकत्र येऊन फिर्यादी यांना मारहाण करून त्यांच्या राहत्या घरातून हाकलून लावून जबरदस्तीने अतिक्रमण केले. त्यांच्या घरात घुसून संसारोपयोगी साहित्य रस्त्यावर फेकून शिवीगाळ केली. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक मुल्ला हे करीत आहेत.

# सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे ४५ कोटी रुपये थकले

## रजा-पेन्शन विक्री देय रकमांपासून १६७० निवृत्त अधिकारी-कर्मचारी वंचित

सुराज्य/सोलापूर

**महापालिकेची आर्थिक स्थिती बिकट असल्याचे सांगत प्रशासनाने कर्मचारी, ठेकेदार आणि इतरांची कोट्यावधी रुपयांची देयके थकविली तर आहेतच, मात्र वर्षानुवर्षे महापालिकेत सेवा बजावून निवृत्त झालेले १६७० अधिकारी-कर्मचारी हे रजा आणि पेन्शन विक्रीतून मिळणाऱ्या देयकाच्या लाभापासून गेल्या अनेक वर्षांपासून वंचित आहेत. या अधिकारी कर्मचाऱ्यांचे सुमारे ४५ कोटी रूपये महापालिकेकडे थकीत आहेत.**

सध्या महापालिकेच्या आस्थापनेवर ४७०० कर्मचारी असून यापैकीही अनेक कर्मचारी निवृत्तीच्या उंबरठ्यावर आहेत. गेल्या काही वर्षांपासून टप्प्याटप्प्याने सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांपैकी १६७० जणांची अर्जित रजा आणि पेन्शन विक्रीची देयके थकीत आहेत. यामध्ये शिल्लक अर्जित रजा असलेल्या ४७६ कर्मचाऱ्यांची १३ कोटी ५६ लाख आणि पेन्शन विक्री केलेल्या



१ हजार १९४ कर्मचाऱ्यांची ३१ कोटी ५६ लाखांची देयके थकीत आहेत.

महापालिकेच्या अधिकारी कर्मचाऱ्यांच्या वेतनावर सध्या सुमारे १२ ते १३ कोटी रुपयांचा खर्च आहे.

### ...तर शेवटच्या कर्मचाऱ्याला रक्कम मिळण्यासाठी ४ वर्षे लागणार

यंदा आतापर्यंत जीएसटी अनुदानासह ३२५ कोटींचे उत्पन्न मिळाले आहे. गेल्या महिना-दोन महिन्यात मिळकत करातून मोठी वसुली झाली आहे. यामुळे आता प्रशासनाकडून आपली देयके मिळतील अशा आशेवर सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी आहेत. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची देयके देण्यासाठी यापूर्वी दरमहा २० लाख रुपये लेखा विभागाला देण्यात येत होते. यामुळे दरमहा केवळ सात ते आठ लोकांची देयके देण्यात येत होती.

मात्र तत्कालीन आयुक्त पी. शिवशंकर यांनी यामध्ये वाढ करून ती ३० लाख रुपये केली आहे. यातून अनुक्रमानुसार सुमारे १५ जणांची देयके वितरित केली जात आहेत. या पद्धतीने देयके वितरित करताना पुन्हा वाढलेल्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची संख्या पाहता शेवटच्या कर्मचाऱ्याला क्रमांक येण्यासाठी सुमारे ४ वर्षांचा कालावधी लागणार आहे.

याव्यतिरिक्त इतर मिळून २५ कोटींच्या घरात खर्च जातो. महापालिकेच्या उत्पन्नाची भिस्त ही प्रामुख्याने मिळकत करावर आहे.

गतवर्षी शासनाकडून मिळणाऱ्या जीएसटी अनुदानाशिवाय मिळकतकराच्या २७८ कोटींसह ३४० कोटी रुपयांचे उद्दिष्ट असताना १५० कोटींचेच उत्पन्न महापालिकेला मिळाले आहे. याशिवाय दरमहा जीएसटीपोटी मिळणाऱ्या २० कोटी ६६ लाख रुपयांप्रमाणे २४८ कोटी मिळाले. यासह महापालिकेच्या तिजोरीत ३९५ कोटींचाच भरणा झाला होता. यामुळे महापालिकेने आपले हात आकडते घेत ठरल्या पध्दतीने अनेकांची देयके थकीत ठेवली आहेत.

### पेन्शनवर होतो ६ कोटींचा खर्च !

महापालिकेत सध्या २ हजार ३६० निवृत्तीवेतनधारक असून त्यांच्या वेतनावर ४ कोटी १ लाख १४ हजार ५४२ रुपये तर १ हजार ७८१ कुटुंब निवृत्ती वेतनधारकांवर १ कोटी ८२ लाख ९८ हजार ८६८ रुपये असे एकूण ४ हजार १४१ जणांवर तबब्ल ५ कोटी ८४ लाख ४६ हजार ९७३ रुपये खर्च येत आहे.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R.N.I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail.com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# कोळेगावातील दारूबंदीसाठी सहाशे महिलांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

## गावातील दारूबंदी करण्यासाठी उभी बाटली आडवी करण्यासाठी ग्रामसभा बोलण्याची मागणी

सुराज्य/वेळापूर

कोळेगाव (ता.माळशिरस) येथील दारू धंदे तेजीत चालत असून सर्वसामान्य नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागत आहे. कोळगाव मधील बेकायदेशीर दारू धंदे वेळेत बंद झाले नाहीत तर गावाला दारुड्याचे गाव म्हणून गावाची ओळख निर्माण होईल आणि प्रशासनाला नेमके हेच करायचे आहे का असा संतप्त सवाल कोळेगाव येथील महिलांनी प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात विचारला आहे.



सदर निवेदनात म्हटले आहे की गावामध्ये कायदा शांतता सुव्यवस्था बिघडली आहे. रस्त्यावरून फिरणाऱ्या महिलांना जीव मुठीत घेऊन फिरावे लागत आहे. शालेय शिक्षण घेणाऱ्या मुला मुलींना याचा त्रास होत असून शाळेच्या आजूबाजूला हे दारूचे अड्डे चालत आहेत. गावातील तरुण पिढी व्यसनाच्या आहारी जात असून ते स्वतःचे जीवन उध्वस्त करताना दिसत आहेत.

गावाची शांतता बिघडली असल्याने गावात शांतता सलोखा ठेवणे अवघड झालेले आहे. अशा गोष्टींना वेळीच आवर घालणे गरजेचे आहे. महिलांनी कमवलेले चार पैसे घरातील कर्ते पुरुष दारू पिण्यासाठी नेत आहेत व ते पैसे दिले नाही तर महिलांना मारहाण केली जाते तरी प्रशासनाने याकडे लक्ष द्यावे गावातील अवैध धंदे मोडून काढावेत या गावांमध्ये दारूच्या बंदीबाबत मतदान प्रक्रिया घेण्यात यावी परवाना व बिगर परवाना धारक धंदे बंद होणे गरजेचे आहे. निवेदनात म्हटले आहे की यामुळे कोळेगावात दारूची बाटली उभी राहणार की आडवी होणार हे प्रशासन कधी ठरवणार याची गावांमध्ये चर्चा सुरू आहे.

> वेळापूर पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या सर्वच गावातील अवैधदारु धंद्यांवर गेल्या वर्षभरात वेळापुर पोलिस स्टेशनने ११७ यापैकी या तीन महिन्यात जवळपास ६७ केसेस कोळेगाव मळोली, वेळापूर, खंडाळी, निमगाव, गावातून दाखल केल्या आहेत. कोळेगावातही अवैध धंद्यांवर केसेस दाखल केले असून जे परमिट रूम बार आहेत त्यांच्यावर परवानाधारक असल्याने कारवाई करता येत नाही मात्र त्यांनी कोणतेही अवैध कृत्य केल्यास एक्ससाइज विभागाकडून त्यांच्यावर कारवाई करता येते. ग्रामसभेने ठराव केल्यास परवानाधारक परमिट रूम बार याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना आहे.
>
> **- निलेश बागाव, सहाय्यक पोलीस निरीक्षक वेळापूर पोलीस स्टेशन**

# औज येथे दोन मुलांचे अपहरण

सुराज्य/दक्षिण सोलापूर

दक्षिण सोलापूर तालुक्यातील औज (मंद्रूप) येथील दोन मुलांचे अपहरण केल्याप्रकरणी मंद्रूप पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती मंद्रूप पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक रवींद्र मांजरे यांनी दिली.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील औज (मंद्रूप) येथे शेतमजूर राहतो. सायंकाळी ५ वा.च्या सुमारास त्यांची तीनही मुले खेळत होती. त्यावेळेला सायंकाळी सात वाजता एक मुलगा व एक मुलगी असे दोघेजण गावात राहणाऱ्या आत्याकडे व आजीकडे जातो. तेथे जेवण करून येताना तुम्हाला डबा आणतो, असे सांगेन पायी गावातील घराकडे गेले. रात्री नऊ वाजले तरी मुले घराकडे परत आले नसल्याचे पाहून शेतमजूर गावाकडे राहत असलेल्या आपल्या आईकडे गेले असता आईने सायंकाळी साडेआठच्या सुमारास डबा घेऊन दोन्ही मुले तुझ्याकडेच गेली, असे सांगितले. मुलाबाबत चौकशी केली असता कुठेही तपास लागला नाही. त्यामुळे मंद्रूप पोलीस स्टेशन येथे अज्ञातविरोध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



## लहुजी शक्ती सेनेचे जिल्हाध्यक्ष वसंत देडे यांचा सन्मान

**अक्कलकोट** : अक्कलकोट येथील एशियन पेंटच्या सहयोगाने व लहजी शक्ति सेना पेंटींग कर्मचारी असोशियन अक्कलकोट यांच्या प्रयत्नातून झोपडपट्टीतील गरीब बेघर विद्यार्थी ज्या ठिकाणी शिक्षण घेतात अशा त्या काशीराया पाटील प्रशाला प्रमिला पार्क एवन चौक, अक्कलकोट येथील शाळेच्या इमारतीला आतील बाजूस रंगरंगोटीचे काम करून दिल्याने काशिराया काका पाटील प्रशालेचे चेअरमन मल्लिकार्जुन पाटील यांच्या हस्ते २६ जानेवारी २०२३ रोजी प्रजासत्ताक दिनी वसंत देडे यांचा मान सन्मान करण्यात आला.यावेळी सत्काराला उत्तर देताना लहुजी शक्ति सेनेचे सोलापूर जिल्हाध्यक्ष वसंत भाऊ देडे म्हणाले, मला जो मानसन्मान केला त्याच्याबद्दल मी काशीराया काका प्रशालेचे चेअरमन मल्लिकार्जुन पाटील यांचा मनापासून ऋणी आहे.व माझ्याबरोबर त्याच शाळेत शिक्षण घेतलेले राजशेखर माशाळे मेजर व त्यांचे सहकारी लक्ष्मण बिराजदार, प्रशालेचे मुख्याध्यापक फुलारी, शिवराज स्वामींचे देखील आभारी मानत या कामासाठी चेअरमन मल्लीकार्जुन पाटील, समीर मणियार व कवठे सरांचा फार मोठा योगदान म्हणावा लागेल. कारण वेळोवेळी पाठपुरावा करून कामाला गती घेतली व काम पुर्णत्वास नेले. काशीराया काका पाटील प्रशालेतील सर्व शिक्षक वृंदांचे व विद्यार्थी मित्रांचे मनापासून जाहीर आभार व्यक्त केले.

## लता मंगेशकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त मंगळवारी बॉलिवूड की यादे कार्यक्रम



**सोलापूर** : भारतरत्न, गान कोकिळा लता मंगेशकर यांच्या प्रथम स्मृतीदिनानिमित्त मंगळवार दि. ३१ जानेवारी २०२३ रोजी सायंकाळी ४.३० वाजता हुतात्मा स्मृती मंदिरात सदाबहार सिंगिंग स्टुडिओ - आर्केस्ट्रा आणि एसपी फाउंडेशन यांच्यावतीने बॉलीवूड की यादे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती गायक युसुफ पिरजादे यांनी पत्रकार परिषदेत दिली. हा कार्यक्रम रसिक प्रेक्षकांकरिता मोफत ठेवण्यात आला आहे. यामध्ये गायक युसुफ पिरजादे, नागराज कनकी, गायिका सुनिता राठोड, कविता जागीरदार (कर्नाटक), रफिक शेख, जुनेद शहा यांच्या बहारदार गाण्यांची मेजवानी मिळणार आहे. तसेच यावेळी फॅशन डिझायनर रोहित उबाळे , अमृता कल्याणी, अनिता कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली फॅशन शोही आयोजित केला आहे. नृत्यांचेही सादरीकरण यावेळी होणार आहे. रसिकांसाठी प्रत्येक पंधरा मिनिटाला लकी ड्रॉ कूपन काढण्यात येणार आहे, असेही युसुफ पिरजादे यांनी सांगितले.या पत्रकार परिषदेस सुनीता राठोड , नागराज कनकी, अमृता कल्याणी आदी उपस्थित होते.




## वेळापूर येथे २४५ जणांची मोफत नेत्ररोग तपासणी व शस्त्रक्रिया

**वेळापूर** : माळशिरस तालुक्यातील वेळापूर पालखी चौक येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाचे नेते उत्तमराव जानकर यांच्या उपस्थितीत अमोल पनासे व सेवासदन नेत्र रुग्णालय मिरज यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्ररोग तपासणी व मोती बिंदु निदान शिबिर शनिवारी रोजी पार पडले. या शिबिरामध्ये २४५ जणांची मोफत नेत्ररोग तपासणी करण्यात आली. यासाठी सेवासदन नेत्र रुग्णालयाच्या, डॉ रवींद्र बाबर, डॉ. पवार, डॉ.लता मोरे मॅडम यांची टीमने विशेष परिश्रम घेत नेत्र तपासणी शिबीर पार पाडले.यावेळी जवान माने देशमुख, अमोल पनासे व ग्रामस्थ उपस्थित होते.

## निधन वृत्त

### सिंधुबाई गिरमे



**माळीनगर** : येथील सिंधुबाई नामदेव गिरमे (वय ८०) यांचे शुक्रवारी (ता.२७) वृद्धापकाळाने निधन झाले.त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली, सून, नातवंडे असा परिवार आहे. येथील शुगरकेन सोसायटीचे व्यवस्थापक अनिल गिरमे यांच्या त्या मातोश्री होत.

### सावित्रीबाई लोखंडे



**पिलीव** : पिलीव येथील सावित्रीबाई मारुती लोखंडे यांचे अल्पशा आजाराने वृद्धापकाळाने निधन झाले. त्या ८४ वर्षाच्या होत्या. त्यांच्या पश्चात चार मुले, दोन मुली, सुना नातवंडे असा परिवार आहे.

### मनोज गाढवे




**वेळापूर** : वेळापूर येथील मनोज गाढवे याचे वयाच्या ३५ व्या वर्षी दुःखत निधन झाले. त्यांचे पश्चात पत्नी, एक मुलगा व एक मुलगी असा परिवार आहे. वेळापूर येथील व्यापारी पेठेतील श्री नवतरुण गणेशोत्सव मंडळाचे ते सक्रिय कार्यकर्ते होते. अनेक सामाजिक कार्यात त्यांचा नेहमीच सहभाग होता.

### हा.सिकंदरसो रसुलसो कामतीकर



**सोलापूर** : सोलापूरचे प्रसिध्द पत्र्याचे व्यापारी व सोलापूर जिल्हा बागवान जमातचे अध्यक्ष हा.सिकंदरसो हा रसुलसो कामतीकर यांचे निधन झाले. ते वीस वर्ष सो.शो.अर्बन बँकेचे चेअरमन होते. पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### राजअहमद काखंडकीकर



**सोलापूर** : मुस्लिम पाच्छा पेठ येथील रहिवासी राजअहमद सय्यदसाब काखंडकीकर (वय ९४ वर्षे) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सून, नातू, नातवंडे असा परिवार आहे.

# घरात असताना कन्हेरगाव येथे चोरी; रोख रकमेसह ७० हजारांचे दागिने लंपास

सुराज्य/सोलापूर

घरात झोपलेले असताना चोरट्याने कपाट उचकटून रोख रकमेसह ७० हजाराचे दागिने पळविले. ही धाडसी चोरी कन्हेरगाव (ता.माढा) येथे शुक्रवारी पहाटेच्या सुमारास घडली.

यासंदर्भात शरद बाळासाहेब हांडे (रा. कन्हेरगाव) यांनी टेंभुर्णी पोलिसात फिर्याद दाखल केली. ते नेहमीप्रमाणे गुरुवारी रात्री जेवण करून आपल्या कुटुंबीयांसह घरात झोपले होते. पहाटे दीड ते दोन वाजेच्या सुमारास दरवाजाचा आवाज आल्याने ते जागे झाले. त्यावेळी एक चोरटा घरातून बाहेर जाताना दिसून आला. त्यांनी पाठलाग करून पकडण्याचा प्रयत्न केला. मात्र चोरटा अंधाराचा फायदा घेऊन पसार झाला. त्या चोरट्याने त्यांच्या लोखंडी कपाटातील रोख २० हजार रुपये आणि १७ ग्रॅम सोन्याचे दागिने असा एकूण ७० हजाराचा माल चोरून गेल्याचे फिर्यादी नमूद आहे. पुढील तपास सहाय्यक फौजदार सरडे करीत आहेत.

### दुकानाची तोडफोड करून महिलेस मारहाण

मित्राला पाण्याची बाटली का दिली नाही? या कारणावरून दुकानात घुसून शिवीगाळ करीत दुकानाची तोडफोड केल्याची घटना पंढरपूर येथील अनिल नगरात घडली. यासंदर्भात मीना सुरेंद्र बैरागी (वय ३० रा. अनिलनगर, पंढरपूर) यांनी पंढरपूर शहर पोलिसात फिर्याद दाखल केली. पोलिसांनी विजय आणि त्याचा भाऊ विशाल दशरथ नेमाडे आणि पूजा राकेश नेमाडे (सर्व रा.म्हसोबा मंदिर पंढरपूर) या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला. तिघांनी दुकानात घुसून मीना बैरागी यांना शिवीगाळ केली. पूजा हिने मीना बैरागी यांची मुलगी निशा हिला हाताने मारहाण केली. दुकानातील सामान खाली पाडून काऊंटरचे काच फोडून ५०० रुपयाचे नुकसान केले. अशी नोंद पोलिसात झाली. फौजदार मुळे पुढील तपास करीत आहेत.

# सांगोला तालुक्यात गावठाण ड्रोन सर्व्हे

सुराज्य/सांगोला

सर्वे ऑफ इंडिया भारत सरकार भूमी अभिलेख महाराष्ट्र राज्य आणि ग्राम विकास विभाग महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने गावठाण ड्रोन सर्वेचे काम सांगोला तालुक्यात प्रगतीपथावर चालू असून तालुक्यातील ४७ गावांचा ड्रोन फ्लाय पूर्ण होऊन ४० गावांचे चौकशी काम ही पूर्ण झाले आहे चौकशी कामाशी पूर्तता होऊन ४० पैकी तेरा गावांच्या, सनदा प्राप्त झाल्याची माहिती भूमी अभिलेख कक्ष सांगोल्याच्या उपाधीक्षक रेश्मा तांबारे यांनी दिली.

गळवेवाडी तालुका सांगोला येथे दिनांक २६ जानेवारी २०२३ रोजी ग्रामसेवक पठाण भूमी अभिलेख उपाधीक्षक रेश्मा तांबारे. भूमी अभिलेख विभागाचे कर्मचारी योगेश गोरे नामदेव माळी उपाधीक्षक गणेश सरडे यांच्या उपस्थितीत मिळकत पत्रिकांच्या वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला. गळवेवाडी गावातील नागरिकांनी सनदेचे महत्व लक्षात घेऊन उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन सनद फी चा भरणा करून सनदा प्राप्त करून घेतल्या ज्या गावांमध्ये दोन सर्वेचे काम पूर्ण झाले आहे त्या गावांच्या सनदा वाटपाचा कार्यक्रम पुढील महिन्याभरात संपूर्ण सांगोला तालुक्यात राबविण्यात येणार आहे तरी नागरिकांनी भूमी अभिलेख विभागातर्फे आवाहन करण्यात येते की सनद हा मालकी हक्काचा कायदेशीर पुरावा असल्याने फी चा भरणा करून सनद प्राप्त करून घ्यावी सनदहा एकदाच मिळणारा मालमत्तेचा अंतिम पुरावा आहे सनद फी भरल्यानंतर मिळकत पत्रिका म्हणजे तिथे सिटीसर्वे चा उतारा जनतेस ऑनलाईन उपलब्ध होणार आहे तरी सर्वांनी सर्व नागरिकांनी सनद प्राप्त करून घ्यावी आज रोजी बुरलेवाडी हटकर मंगेवाडी गुणापवाडी वाकी घेरडी वाणी चिंचाळे गळवेवाडी काळेवाडी हबीशे वाडी राजापूर खिलारवाडी देवकतेवाडी गायगव्हाण कारंडेवाडी या तेरा गावांच्या सनदा प्राप्त झाल्या आहेत. सांगोला येथे संपर्क करून तात्काळ प्राप्त करून घ्यावी असे आवाहन उपाधीक्षक रेश्मा तांबारे यांनी केली आहे.

# प्रभाग २६ मधील विकासासाठी साडेतीन कोटींचा निधी

सुराज्य/सोलापूर

भाजपच्या माजी नगरसेविका राजश्री चव्हाण,दक्षिण मंडळ अध्यक्ष महेश देवकर,डॉ.शिवराज सरतापे यांनी प्रयत्न करून आ. सुभाष देशमुख यांच्याकडून प्रभाग २६ मधील अनेक विनगरातील २२ विकास कामासाठी ३ कोटी ४८ लाखांचा निधी मिळवला आहे. यातून ड्रेनेज, पाण्याची पाईपलाईन,अंतर्गत रस्ते,दिवाबत्ती इत्यादी कामे केली जाणार आहेत.

या निधीतून ज्या ठिकाणी पाण्याची पाईपलाईन व ड्रेनेज लाईन झालेली आहे तेथे रस्ते कामाची सुरुवात जलद गतीने होणार आहे. मिळालेल्या निधीतून राघवेंद्र नगर चव्हाण घर ते महेश बोरगावकर घर रस्ता करणे., २) राघवेंद्र नगर बिराजदार घर ते कापसे घर पर्यंत रस्ता करणे.उद्धव नगर येथील प्रीती बस स्टॉप ते उद्धव नगर कडे जाणारा रस्ता करणे,गुरुदेव दत्त नगर भाग २ येथील अंतर्गत रस्ते करणे, सवेरा नगर येथील बडुरे घर ते खिलारे घर पर्यंत रस्ता करणे,सवेरा नगर येथील चिंचोळकर घर ते लाईने घर पर्यंत रस्ता करणे, रेणुका नगर येथील अंतर्गत रस्ते करणे ,कोळी समाज सोसायटी येथील अंतर्गत रस्ते करणे, चिदंबरम नगर येथील राजमाने घर ते कुलकर्णी घर पर्यंत रस्ता करणे, कल्याण नगर भाग १ विशाल नाईकवाडी घर ते पंडित अंबारे घर पर्यंत रस्ता करणे , स्वामी समर्थ नगर सोसा. एसआरपी कॅम्प जवळ प्लॉट नंबर २१० ते प्लॉट नंबर २५९ पर्यंत रस्ता करणे, स्वामी समर्थ सोसा. एस आर पी कॅम्प जवळ गेट न.२ ते गावकरे घरापर्यंत रस्ता करणे. समर्थ सोसा. एस आर पी कॅम्प जवळील गेट १ ते निळ घरापर्यंत रस्ता करणे,समर्थ सोसायटी एस आर पी कॅम्प जवळ नीळ घर ते गावकरे घरापर्यंत रस्ता करणे, समर्थ सोसायटी एसआरपी कॅम्प जवळ बागल घर ते माने घरापर्यंत रस्ता करणे, भाग्यलक्ष्मी पार्क येथे रावसाहेब घर ते आनंद पाटील घर ते मंगल विहार पर्यंत रस्ता करणे, चंडक मळा परिसरात अंतर्गत रस्ते करणे, राम नारायण चंडक विहार येथे अंतर्गत रस्ते करणे, विश्व नगर येथील अंतर्गत रस्ते करणे,द्वारका नगर बस स्टॉप ते शाम धूरी घरापर्यंत रस्ता करणे, गुरुदेव दत्त नगर मधील महालक्ष्मी नगर ते रेणुका मंगल कार्यालय पर्यंत रस्ता करणे, अभिषेक नगर येथील अंतर्गत रस्ते करणे.



# अक्कलकोटमध्ये गणेश जयंती धार्मिक कार्यक्रमाने उत्साहात

सुराज्य/अक्कलकोट

तीर्थक्षेत्र अक्कलकोट शहरात विजय गणपतीसह विविध ठिकाणी गणेश जयंती विविध धार्मिक कार्यक्रमाने उत्सहात साजरी करण्यात आली. दिवसभर हजारो भाविकांनी मनोभावे दर्शन घेतले. त्याबरोबर महाप्रसादाचे लाभ घेतले.

सालाबादप्रमाणे यंदाही एवन चौक येथील विजय गणपती मंदिरात जयंती च्या आदल्या दिवशी सायंकाळी ७ वाजता अथर्वशीर्ष पठण कार्यक्रम झाला. यासाठी शेकडो महिलांनी सहभाग नोंदवला.

तसेच सुभाष गल्लीतील रिद्धी सिद्धी गणेश मंदिरात सुद्धा अशाच प्रकारचे धार्मिक कार्यक्रम संपन्न झाला. याही ठिकाणी भाविकांनी मनोभावे दर्शन घेऊन महाप्रसादाचे लाभ घेतले. समर्थनगर येथील रिद्धी सिद्धी गणेश मंदिरातही धार्मिक कार्यक्रम साजरा करण्यात आले. शिवाजी नगर तांडा, खासबाग येथील नवस्या गणपती आशा विविध ठिकाणी गणेश जयंती उत्साहात साजरी करण्यात आले. विशेषतः सर्वत्र महिला भाविक उल्लेखनीय उपस्थित दर्शविली.

दिवसभरात खा. डॉ जयसिद्धेश्वर म्हास्वामीजी, तहसीलदार बाळासाहेब सिरसट, उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्रसिह गौर, पोलीस निरीक्षक महेश स्वामी, सिद्धेश्वर कल्याणशेट्टी, माजी नगराध्यक्ष बसलिंगप्पा खेडगी, बार असोसिएशनचे अध्यक्ष विजय हर्डीकर,वटवृक्ष मंदिर समितीचे अध्यक्ष महेश इंगळे ,डॉ प्रकाश कलशेट्टी, बसवराज माशाळे,किरण सिरसे, डॉ अरुण बारवडे , सुचिता मिलिंद थोबडे, डॉ गिरीजा राजीमवाले, शांभवी कल्याणशेट्टी, यांच्यासह विविध बँकेचे अधिकारी,कर्मचारी,प्राध्यापक,शिक्षक, आदींनी दर्शनाचा लाभ घेतले. कार्यक्रम यशस्वी साठी प्रा. नितीन पाटील, प्रमोद कोरे, प्रा.जवळगे सतीश पाटील, करमल,राहुल कारले, विशाल कारले, निगणा भुयारे, बसवराज बिऱ्हाडे, ओम तोळणूरे, खंडप्पा बिराजदार, समर्थ जेऊरे, शरणप्पा कुंभार, श्रीकांत नरूणे, मुन्ना ताची, राजू घोडके, राजू देशपांडे, सैपन मकानदार, प्रल्हाद मिस्त्री, ओमप्रकाश, संतोष हरवाळकर, उपस्थित होते.

# वैरागमध्ये कत्तलीसाठी जाणाऱ्या ४५ वासरांना प्राणीमित्रांनी दिले पोलिसांच्या ताब्यात

**वैराग** : माढा येथून उस्मानाबादकडे कत्तलीसाठी निघालेल्या ४५ वासरांच्या पिकअप ला वैरागच्या संभाजी चौक येथे प्राणी मित्रांनी पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले.

प्राणीमित्र सुरज माने ,गणेश जाधव, शुभम जाधव, सत्यवान ताटे, सुरज माने हे पाच जण वैराग येथील संभाजी चौक, मोहोळ रोड वैराग येथे थांबले असता दि २७ रोजी शुक्रवारी रात्री १० सुमारास पिकअप क्र एम.एच४५ टी ३९८४मधुन कत्तलीसाठी उस्मानाबादला ४५ लहान वासरे घेऊन जात असताना प्राणी मित्रांना बातमीदारांकडून माहिती मिळाली होती त्यावेळी प्राणी मित्रांनी वाहन अडवून चालकाला नाव विचारले असता अब्दुल शुकर मुलाणी (रा.माढा) असे सांगितले.

त्यानंतर पोलिसांना खबर दिल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी येऊन पाहिले असता ४५ लहान वासरे गाडीत चारापाण्याची व औषधाची सुविधा नसताना नायलनच्या दोरीने वासरांचे हातपाय बांधून ठेवलेल्या आढळून आले त्या वासराची किंमत प्रत्येकी एक हजार प्रमाणे ४५ हजार व वाहणाची किंमत तीन लाख रुपये असा एकूण ३ लाख ४५ हजाराचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेऊन चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# शहरातील जड वाहतूक ५ दिवसात बंद करा अन्यथा पालकमंत्र्यांच्या घरासमोर आंदोलनाचा इशारा

सुराज्य/सोलापूर

शहरात जड वाहतुकीमुळे अपघातांची संख्या वाढत आहे.लोकांचे बळी जात आहेत. अपघाताची मालिका सुरू असल्याचे दिसून येत आहे. अपघात टाळण्यासाठी येत्या पाच दिवसात जड वाहतूक बंद करावी. प्रशासकीय स्तरावर जिल्हा प्रशासन, महापालिका, पोलीस आयुक्तालय आणि वाहतूक शाखा यांच्यात समन्वय साधून एक कृती आराखडा तयार करावा.

जनहितार्थ प्रसिद्ध करावा अन्यथा पालकमंत्र्यांच्या अहमदनगर येथील घरासमोर आंदोलन करणार असल्याचा इशारा विविध - पक्ष संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषदेत दिला आहे. सोलापूर शहरात गेल्या अनेक दिवसापासून जड वाहतुकीमुळे अपघाताची मालिका सुरू आहे लोकांचे बळी जात आहेत. शहरात जड वाहतूक कशी काय सुरू आहे ? जड वाहनांचा अमर्यादित वेग आणि अवाजवी क्षमतेपेक्षा जास्त करणे, हे गंभीर आहे. याकडे वाहतूक पोलिसांचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप सोलापूर युवक प्रतिष्ठानचे राज सलगर यांनी केला आहे. शहर विकास कामांतर्गत रस्ते खोदले मात्र डांबरीकरण करण्यात आले नाहीत. रस्त्यावरील खड्डे बुजवण्याची आवश्यकता आहे.अपघाताची मालिका सुरू असल्याचे दिसून येत आहे. अपघात टाळण्यासाठी येत्या पाच दिवसात जड वाहतूक बंद करावी. प्रशासकीय स्तरावर जिल्हा प्रशासन, महापालिका, पोलीस आयुक्तालय आणि वाहतूक शाखा यांच्यात समन्वय साधून एक कृती आराखडा तयार करावा.जनहितार्थ प्रसिद्ध करावा,अशी मागणी केली आहे.अपघाताची मालिका सुरू असताना दुसरीकडे सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे मात्र याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप पदाधिकाऱ्यांनी केला आहे. त्यांनी तातडीने या गंभीर प्रश्नाकडे लक्ष देऊन उपाययोजना करावी. कारवाई करण्याचे आदेश द्यावेत अन्यथा पालकमंत्र्यांच्या अहमदनगर येथील घरासमोर आंदोलन करणार असल्याचा इशारा सोलापूर युवक प्रतिष्ठानचे राज सलगर, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे सुहास कदम यांनी दिला आहे.




या पत्रकार परिषदेस युवक पँथर सामाजिक संघटनेचे अतिश बनसोडे, हॅप्पी युथ क्लबचे सोहन लोंढे, प्रशांत बाबर, मराठा क्रांती मोर्चाचे राम जाधव, प्रवीण कांबळे, शेखर बंगाळे, निशांत सावळे, युवक काँग्रेसचे शरद घुमटे, शोहेब चौधरी, सोमनाथ राऊत आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.



## बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त नातेपुते येथे रक्तदान शिबिर

**नातेपुते** : हिंदुह्रदय सम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीचे औचित्य साधुन नातेपुते शहर शिवसेना व युवासेनेच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरास उस्फुर्त प्रतिसाद मिळाला. यामुळे कार्यक्रमास जिल्ह्याचे संपर्क प्रमुख अनिल कोकीळ व राज्य विस्तारक उत्तम अहिवळे तालुका प्रमुख नामदेव वाघमारे यांनी फोन करून शिवसेनेचे तालुका उपप्रमुख अमोल उराडे, तसेच रुपेश लाळगे, सनी गवळी, अक्षय कुचेकर यांच्या सह सर्व शिवसैनिकांचे अभिनंदन केले.तसेच युवासेना जिल्हाप्रमुख गणेश इंगळे, युवासेना सहसचिव स्वप्नील भैय्या वाघमारे यांनी, विधानसभा प्रमुख, तसेच दत्ताजी साळुंखे, नातेपुते नगरीच्या नगराध्यक्षा उत्कर्षाराणी पलंगे, उमेश पलंगे यांनी भेट देऊन बाळासाहेबांना आदरांजली अर्पण केली. रक्तदान शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी पंचायत समिती सदस्य माऊली पाटील, उद्योजक अतुल बावकर, नगरसेवक अतुल पाटील, नगरसेवक ॲड.रणवीर देशमुख, कोडलकर, निशांत इंगोले, गणेश ठोंबरे, सुरज चांगण, लखन चांगण, गणेश चांगण, अमीर मुलाणी, यांच्या सह नातेपुते शहरातील सर्व शिवसैनिक युवसैनिक उपस्थित होते. बाळासाहेब ठाकरे यांच्या ९७ व्या जयंती दिवशी ९७ रक्तदात्यांनी रक्तदान केले त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार संजय चांगण, रिहाल तांबोळी, अमित भरते, अक्षय कुचेकर, साजिद आतार, किशोर राऊत नवनाथ राऊत, गणेश मोरे, समीर ढोबळे, पप्पू ढोबळे दादा काटकर, संतोष कुचेकर, इ शिवसैनिकांनी रक्त दात्यांचे आभार मानले

## न्यू हायस्कूलचे स्नेहसंमेलन

**उत्तर सोलापूर** : सलगरवाडी डोनगावरोड येथील न्यू हायस्कूल सलगरवाडी वार्षिक स्नेह संमेलन व पारितोषक वितरण संपन्न झाले.कार्यक्रमाची सुरुवात विद्येची देवता सरवस्ती, संस्थापक अध्यक्ष स्व चंद्राम चव्हाण गुरुजी,स्व मोहन चव्हाण यांच्या प्रतिमेच पूजन सुभाष चव्हाण यांच्या अध्यक्षेखाली करण्यात आले.यावेळी मुख्याध्यापक, विवेक चव्हाण, मुख्याध्यापक कार्तिक चव्हाण, मुख्याध्यापक जयवंत हक्के, नामदेव चव्हाण, लक्ष्मीदेवी चव्हाण, मुबारक शेख, मुजावर, राम वाकसे, बापूराव माने, नागेश गायकवाड, वरहाडे, इस्माईल ढवलगी, बिराजदार यांच्या प्रमुख उस्थितीत करण्यात आले. यावेळी प्रशालेतील विद्यार्थ्यांनी सामूहिक, सांस्कृतिक, वैयक्तिक गीते सादर केली.यशस्वी व विविध खेळ प्रावीण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले.

## माऊली महाविद्यालयाच्या प्रांगणात जल्लोष कलाविष्कार

**उत्तर सोलापूर** : तालुक्यातील श्री भारत शिक्षण प्रसारक मंडळ संचलित वडाळा माऊली इंग्लिश मीडियम, न्यू हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय (कला व विज्ञान), वडाळा माऊली महाविद्यालय(कला व विज्ञान), माऊली एज्युकेशन महाविद्यालय, माऊली मतिमंद निवासी महाविद्यालय वडाळा मधील विद्यार्थ्यांनी आपल्या कला व गुणांचा अविष्कार दाखवून दिला. महाविद्यालयाच्या प्रांगणात वार्षिक स्नेहसंमेलन जल्लोष नटराज पूजनाने उदघाटन सुप्रसिद्ध गायक मोहम्मद अयाज शेख , आमदार यशवंत माने, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष बळीराम साठे, संस्थेचे चेअरमन जितेंद्र साठे, डॉ वैशाली ताई साठे हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी संस्थेचे संचालक दत्तात्रय गायकवाड गुरुजी,हरीभाऊ घाडगे, नानासाहेब शिंदे, कविता शिंदे, सुरेश साठे, माजी सरपंच बाळूसाहेब सुतार, अनिल माळी उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य मनोज साठे, संपत गाडे, प्रभाकर गायकवाड माजी सरपंच, माऊली महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दत्तात्रय हरवाळकर, न्यूहायस्कूल महाविद्यालयाचे प्राचार्य शंकर खळसोडे, मतिमंद निवासी विद्यालयाचे प्राचार्य वाघमारे सर, माऊली एज्युकेशनचे महाविद्यालयाचे प्राचार्य सर्वदे यांच्यासह शिक्षक वृंद उपस्थित होते.




## लिंगायत स्मशानभूमीची स्वच्छता करा व ५ एकर जागा मिळण्यासाठी आंदोलन

**मोहोळः** येथील लिंगायत स्मशानभूमीसाठी असलेल्या जमिनीतील काटेरी झाडी काढावी आणि अन्य स्वच्छता करून द्यावी त्याचप्रमाणे ५ एकर जागा देण्यात यावी या मागणीसाठी समस्त लिंगायत समाज बांधवांच्या वतीने शुक्रवारी दि.२७ जानेवारी रोजी एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण करण्यात आले.या मागणीचे निवेदन विलास म्हमाणे यांच्या सह समाज बांधवा च्या सहीने १० दिवसांपूर्वी मोहोळचे तहसीलदार, पोलीस निरीक्षक आणि नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांना देण्यात आले होते. मात्र त्यावर काही निर्णय झालेला नव्हता त्यामुळे ठरल्याप्रमाणे लिंगायत समाज बांधवांनी हे उपोषण केले. याबाबतचा पाठपुरावा आणि योग्य ती कारवाई आम्ही लवकर करू असे लिखित आश्वासन दिल्यानंतर उपोषणाची सांगता करण्यात आली. यामध्ये धर्मवीर विलास म्हमाणे यांचे नेतृत्वाखाली बाळासाहेब वस्त्रे, युवा नेते संतोष वायचळ, लक्ष्मण पाटील, बाळासाहेब गवळी, उमेश्वर पुराणिक, गणेश डोकडे, रविराज विभुते, अमित बावकर, राकेश देशमाने,आबा आंडगे, प्रसाद वस्त्रे आदिं समाजबांधव उपस्थित होते.

# माघीवारीसाठी १ हजार ५५० पोलीस अधिकारी व कर्मचारी सज्ज

नागरिकांच्या सुरक्षेसाठी एसआरपीएफ तुकडी तैनात; उपविभागीय पोलीस अधिकारी कदम यांची माहिती

**सुराज्य/पंढरपूर**

माघ शुद्ध एकादशी १ फेब्रुवारी २०23 रोजी आहे. माघवारीसाठी श्री विठ्ठल-रुक्मिणीमातेच्या दर्शनासाठी पंढरपुरात भाविक मोठ्या प्रमाणात येतात. वारीत येणाऱ्या भाविकांच्या व स्थानिक नागरिकांच्या सुरक्षेसाठी तसेच वारी सुरक्षितपणे पार पडण्यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज असल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांनी दिली.



माघी वारीत पोलीस प्रशासनाने वारकरी तसेच स्थानिक नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य दिले आहे. सुरक्षेसाठी व वाहतुक नियत्रंणासाठी १ हजार ५५० पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. यामध्ये २ पोलीस उपअधिक्षक, २१ पोलीस निरिक्षिक, ६९ सहाय्यक पोलीस निरिक्षक व पोलीस उपनिरिक्षक, ७१३ पोलीस कर्मचारी व १०० होमगार्ड तसेच १ एसआरपीएफ कंपनीच्या तुकडी तर एक शिघ्र कृती दल पथक नियुक्त करण्यात आले आहेत.

■ वारी कालावधीत गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी नदीपात्र, ६५ एकर, महाव्दार, महाव्दार घाट, पत्राशेड या सहा ठिकाणी वॉच टॉवर करण्यात आले आहेत.

■ वारी कालावधीत वाहतुकीची कोंडी होऊ नये भाविकांना वाहुकीचा कोणताही अडथळा येऊ नये यासाठी जड वाहतुक शहराबाहेरुन वळविण्यात आली आहे. तसेच वाहतुक नियमनासाठी १२ ठिकाणी डायव्हरशन पॉईट करण्यात आले आहेत. खाजगी वाहनधारकांच्या वाहनांना थांबण्यासाठी शहरात तसेच शहराबाहेर वाहनतळ व्यवस्था करण्यात आली आहे.

## भरदिवसा चोरी, मुलाकडून चोरट्यांना पकडण्याचा प्रयत्न

**सुराज्य/श्रीपूर**

येथील पत्रकार प्रकाश केसकर यांच्या ब्रह्मचैतन्यनगर येथील निवासस्थानी भर दिवसा धाडसी चोरीचा प्रकार घडल्याने श्रीपूरमध्ये एकच खळबळ माजली आहे.

केसकर कुटुंब हे आज सकाळी बाहेर गावी गेले आहेत त्यांचा मुलगा प्रतीक केसकर घराला कुलूप लावून बाहेर गेला होता. तो बाहेरून त्याच वेळी घरी आला असता दोन चोरटे कपाट उचकटून आतील वस्तू पाहत होते. तेव्हा केसकर यांचा मुलगा प्रतिक ने एकाला पकडण्याचा प्रयत्न केला त्याला धरलेही होते मात्र चोरट्याने मोठा सुरा बाहेर काढला तेव्हा त्याला सोडून दिले असता चोरट्यांनी घराच्या बाजूला लावलेल्या मोटरसायकल वरून चोरटे पसार झाले. भर वस्तीत दिवसा ढवळ्या चोरी चा प्रकार घडल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. श्रीपूर पोलीस औट पोस्ट चे सहायक फोजदार व त्यांच्या स्टाफने घटनास्थळी भेट देऊन पहाणी केली आहे. गेल्या दोन महिन्यात श्रीपूर परिसरातून अनेक शेळ्या, बोकड, म्हशी चोरून नेण्याचा प्रकार घडले आहेत. दारात लावलेल्या सायकली मोटारसायकल चोरीला गेल्या आहेत. चोरटे हे या परिसरातील किंवा माहिती घेऊन चोऱ्या करत असुन पोलिस खात्याने अशा चोरांचा छडा लावुन त्यांच्यावर कारवाई करावी अशी नागरीकामधुन मागणी होत आहे.



## सिडस् पेस्टीसाईड असोसिएशनच्यावतीने बेमुदत संपाचा इशारा

**सुराज्य/पिलीव**

सिडस पेस्टीसाइड व फर्टिलायझर्स अशोसिएशनच्या वतीने आपल्या विविध मागण्यांचे निवेदन आ.रणजितसिंह मोहिते-पाटील, आ.राम सातपुते, तालुका कृषी अधिकारी, प्रांताधिकारी, गटविकास आधिकारी, तहसीलदार माळशिरस, पोलीस निरीक्षक माळशिरस यांना दिले आहे.



यामध्ये रासायनिक खतांसोबत उत्पादकांकडुन होत असलेल्या अवाजवी लिंकींगबाबत, रासायनिक खत उतपादकाकडुन दुकानदारांना होणारे एक्स खत पुरवठयामुळे, होणारा अन्याय व त्या अनुषंगाने शासनाच्या नियमांचे होणारे उल्लंघन, रासायनिक खत, बिबियाणे व किटकनाशके याचे नमूने अप्रमाणीत आल्यावर होणाऱ्या कारवाईबाबत, रेल्वे स्टेशन व गोदामामधुन व्यापाऱ्यांना पोहोच मिळणेबाबत, कंपनी कडुन सिल पक् आलेला माल त्याचे समपलींग गुणनियंत्रण अधिकाऱ्यांकडुन नमुने काढले जात असता त्याचा नमुना फेल गेला की काही संबंध नसताना दुकानदारावर कारवाई केली जाते.तरी अशावेळी उतपादकांवर कारवाई करावी.

खरीप २०२२ च्या सुरुवातीलाच महाराष्ट्राचे कृषीमंत्री व केंद्राने लिंकींग न करणायाचे आदेश दिले आहेत परंतु खत उतपादकांनी स्वतः च्या फायदयासाठी लिंकींग चालुच ठेवले आहे. केंद्र सरकार रासानिक खतावर मोठे अनुदान देते.रेल्वे स्टेशनवर खताचा रक असताना ते गोदामात नेऊन नंतर व्यापाऱ्यांना बोलावले जाते यामुळे खरे तर वाहतुकीचा खर्च वाढतो याचा शेतकऱ्यांना मोठा भुरदंड बसतो.

या सर्व बाबी बाबत खत उतपादकाकडुन लेखी आश्वासन शासनाला व विक्रेत्यांना दिले नाही तर ३० जानेवारी पासून सर्व विक्रेते बेमुदत संपावर जाण्याचा इशारा माळशिरस तालुका सिडस पेस्टीसाइड व फरटीलायझरस अशोसिएशनच्यावतीने देण्यात आला आहे. तसेच संपामुळे शेतकऱ्यांनच्या होणाऱ्या नुकसानीस आम्ही जबाबदार नसल्याचे अशोसिएशनच्यावतीने निवेदनात म्हंटले आहे. या निवेदनावर अध्यक्ष भिमराव शेंडगे, उपाध्यक्ष सुनील गांधी, सचिव उमेश देशमुख, सहसचिव महावीर शेंडगे, खजिनदार संतोष साळी यांच्या सहया आहेत.



## लोकविकास शिक्षण प्रसारक संस्थेत जागतिक सूर्यनमस्कार दिन साजरा

**सुराज्य/वेळापूर**

लोकविकिस इंग्लिश मिडियम स्कूल व लोकविकास ज्युनिअर कॉलेज यांच्या वतीने जागतिक सूर्यनमस्कार दिनानिमित्त सूर्यनमस्काराने परिपाठाची सुरूवात करत उगवत्या सूर्याला मानवंदना देण्यात आली.

इयत्ता पहिली ते बारावीमधील विद्यार्थाना सूर्यनरकाराचे प्रात्यक्षिक करून दाखिवत सूर्याच्या प्रत्येक नावानुसार एकेक सुर्यनमस्कार सर्व विद्यार्थाकडून करून घेतले. यामध्ये प्रशालेतील सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी सूर्यनमस्कार केले. यासाठी लोकविकास इंग्लिश मिडियमचे मुख्याध्यापक अजित बनकर लोकविकास ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य अमोल पांढरे, सचिन सांळुखे, राहूल बनकर, भालचंद्र साठे आदि शिक्षक उपस्थित होते.

## विवाहितेचा छळ पतीसह; सहा जणांवर गुन्हा

**सोलापूर** : विवाहितेचा छळ केल्याप्रकरणी पतीसह सहा जणांविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी फिर्यादी राजनंदिनी अश्वजीत निसर्गन (वय-२२,रा.भवानी पेठ, जम्मा वस्ती, सोलापूर) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

त्यांच्या फिर्यादीवरून पती अश्वजीत बाबासाहेब निसर्गन,दीर सुलावती निसर्गन, अशितकुमार निसर्गन, जाऊ सोनाली निसर्गन, नणंद अश्विनी प्रशांत केदारी, संघमित्रा दयानंद खंडागळे (सर्व. रा.केंद्रीय विद्यालय शाळा नंबर २, देहूरोड पुणे) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी यांचा विवाह १८ ऑक्टोंबर २०२१ रोजी अश्वचित यांच्यासोबत झाला होता.लग्नानंतर वरील संशयित आरोपी यांनी फिर्यादी यांना वेळोवेळी मानसिक व शारिरीक जाचहाट करून फिर्यादी यांच्या आई वडिलांचे भांडण तंटा करून शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली आहे.तसेच फिर्यादीस नांदविण्यास घेऊन जात नाही.असे फिर्यादीत म्हटले आहे. घटनेचा पुढील तपास मपोसई व्हट्टे या करीत आहेत.




पंढरपूर पोलिसांची कामगिरी

## भाविकांचे चोरीला गेलेले सोने, दोन मोटरसायकली जप्त

■ दोन आरोपींना अटक

पंढरपूर : पंढरपूरात देवदर्शनासाठी आलेल्या भाविकांचे एसटी स्टँडवर गर्दीचा फायदा घेत चोरलेले ५३ ग्रॅम सोने आणि भाविकांच्या २ दुचाकी शोधण्यात पंढरपुर पोलिसांना यश आले आहे. २ आरोपींकडून २ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असल्याची माहिती पोलीस निरीक्षक अरुण फुगे यांनी दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वाशीम येथील लक्ष्मण कोळे पंढरपुरात देवदर्शनासाठी आल्यानंतर दर्शन घेऊन जाताना एसटी बस मध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेऊन त्यांच्याकडील २० ग्रॅम वजनाच्या सोन्याचा गोफ आरोपींनी चोरला होता. तसेच नागाबाई गोगाव (रा. पंढरपूर) या एसटी बस मध्ये चढत असताना त्यांच्या गळ्यातील १३ ग्रॅम सोन्याचे मनी मंगळसूत्र चोरट्याने चोरून नेले होते. तसेच तसेच वैशाली तोडकरी रा. मोडलिंब यादेखील बस मध्ये चढत असताना त्यांच्या गळ्यातील २० ग्रॅम मिनी गंठण चोरांनी चोरले होते. तसेच दर्शनासाठी आलेल्या भाविकांच्या दोन मोटरसायकली अतिश उर्फ महादेव सगर रा. पंढरपूर आणि सोमनाथ काळे रा. वेळापूर या दोघांना पंढरपूर शहर पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने ताब्यात घेतल्यानंतर त्यांच्याकडून दोन मोटरसायकली आणि ५३ ग्रॅम सोने जप्त करण्यात आले आहे.

ही कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम आणि पोलीस निरीक्षक अरुण फुगे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनी चिमणाजी केंद्रे, दत्तात्रेय आसबे, नागेश कदम, राजेश गोसावी, शरद कदम, सुरज हेंबाडे, विपिन ढेरे, सचिन इंगळे, सुनील बनसोडे, सचिन हेंबाडे, दादा माने, राकेश लोहार, शहाजी मंडले आणि सायबर सेलचे अनवर आतार यांनी केली आहे.

## महामार्गासाठी शेतकऱ्याची संमती घेतल्याशिवाय जमिनी घेता येत नाहीत

राजू शेट्टी यांचे आक्रोश परिषदेत आवाहन

**सुराज्य/बार्शी**

महामार्गासाठी जमिनी द्यावयाच्या की नाही हे ठरविण्याचा अधिकार शेतमालकाचा असून तसा कायदा आम्ही सर्वोच्च सभागृहात केल्याने त्या मंजूर कायद्यानुसार जमीन अधिग्रहण करताना ७० टक्के पेक्षा जास्त शेतकऱ्यांची संमती असल्याशिवाय घेता येत नाही. त्यासाठी शेतकऱ्यांनी एकजूट करण्याचे आवाहन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक माजी खासदार राजू शेट्टी यांनी केले.

ते स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने सुरत चेन्नई महामार्ग बाधित शेतकऱ्यासाठी बार्शी येथे आयोजित केलेल्या आक्रोश परिषदेत बोलत होते. यावेळी व्यासपीठावर सोलापूर जिल्हाध्यक्ष शिवाजी पाटील, उस्मानाबाद जिल्हाधक्ष रवींद्र इंगळे, बीडचे कुलदीप वरपे, नगरचे रवींद्र मोरे, जी.प.सदस्य मकरंद निंबाळकर, बार्शीचे ॲड.प्रकाश गुंड, ओमप्रकाश पाटील, शरद भालेकर आदी उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना राजू शेट्टी म्हणाले अधिग्रहन पूर्वी शेतकऱ्याची बैठक घ्यावी लागते अधिकृत नोटिसा द्याव्यात लागतात व वाटाघाटी पूर्ण होऊन पैसे जमा झाल्यावरच प्रत्यक्ष अधिग्रहणाचे काम सुरू केले जाते ही प्रक्रिया पूर्ण न करता जर कोणी जमिनी घेण्याचा प्रयत्न केला तर त्यांना शेतात पाऊल ठेऊ देणार नाही असा इशारा त्यांनी दिला. तत्पूर्वी शेतकऱ्याच्या वहिवाटा व पाईपलाईन पूर्ववत कराव्यात वीजबिल माफ करावे नुकसानभरपाई पिकविम्यातील अनियमितता दूर करावी यासाठी शहरातून शेतकऱ्यांनी पदयात्रा काढली. यावेळी सोलापूर, बीड, उस्मानाबाद, नगर जिल्ह्यातून शेतकरी हजर होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड.प्रकाश गुंड यांनी केले. तर यावेळी शिवाजी गायकवाड, मकरंद निंबाळकर, सत्यवान गायकवाड उपस्थित होते.



# 'परीक्षा पे चर्चा' हा कार्यक्रम म्हणजे सक्षम व मजबूत युवा पिढीची पायाभरणी : आ.आवताडे

**सुराज्य/पंढरपूर**

भारत देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या गतिमान नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आलेला परीक्षा पे चर्चा हा कार्यक्रम म्हणजे सक्षम व मजबूत युवा पिढीची पायाभरणी असल्याचे मत पंढरपूर मंगळवेढा विधानसभा कार्यक्षेत्राचे आमदार समाधान आवताडे यांनी व्यक्त केली आहे. सदर शालेय उपक्रमाच्या अनुषंगाने शालेय विदयार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धांचे बक्षीस वितरण आमदार अवताडे यांच्या अध्यक्षतेखाली सिंहगड कॉलेज कोर्टी येथे संपन्न झाले. त्यावेळी आ.आवताडे हे बोलत होते.




स्पर्धेमध्ये यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा आमदार समाधान आवताडे यांच्या स्वखर्चातील अर्थिक स्वरूपात भरघोस बक्षिसे वितरीत करून कौतुक सोहळा संपन्न झाला. पुनम अनिल रुपनर प्रथम क्रमांक - १५००० हजार रुपये, कु. वैष्णवी सिद्धेश्वर लेंगरे द्वितीय क्रमांक - १०००० हजार रुपये,कु. राजनंदिनी संभाजी फाटे तृतीय क्रमांक - ५००० हजार रुपये, १० स्पर्धक विद्यार्थ्यांना एक्सलंट वॉरियर्स म्हणून प्रत्येकी २००० हजार रुपये प्रमाणे २०००० हजार रुपये, तसेच २५ स्पर्धक विद्यार्थ्यांना सुपर वॉरियर्स म्हणून प्रत्येकी १००० प्रमाणे २५००० हजार रुपये अशी उत्तेजनार्थ बक्षीसे देऊन अभिनंदन पर सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर या स्पर्धेत उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून प्राविण्यप्राप्त शाळांचाही यावेळी सन्मान करण्यात आला. यावेळी , शशिकांत नाना चव्हाण,गादेगाव चे सरपंच मोहन आप्पा बागल श्री शांतिनाथ बागल , श्री द्रोणाचार्य हाके कोर्टी चे उपसरपंच महेश येडगे,गटनेते समाधान घायाळ श्री भैय्यासाहेब कळसे, भास्कर घायाळ ज्येष्ठ पत्रकार आमिन शेख, श्री देवा अंकुशराव, श्री दत्ता कोळेकर श्री आयुब शेख,गटशिक्षणाधिकारी महारुद्र नाळे, शिक्षण विस्तार अधिकारी मारुती निगडे, शिक्षण विस्तार अधिकारी सौ बेबीनंदा पवार, केंद्रप्रमुख चंद्रकांत खुळे, केंद्रप्रमुख अण्णासाहेब पवार, उपशिक्षक शरदचंद्र चटे व भाजपा विविध पदाधिकारी, कार्यकर्ते व विद्यार्थी उपस्थित होते.

### पंतप्रधानाच्या कार्याचा आदर्श घ्यावा

सर्वच सहभागी विद्यार्थ्यांनी अचूक कुंचल्यातून रेखाटन केलेल्या नेत्रदिपक चित्रांचे आणि कलेच्या समर्पक भाव निरागस कौशल्यांचे मला विशेष कौतुक आणि त्यांच्या कलेचा अभिमान आहे. बक्षीस वितरण करून आमदार महोदय यांनी यशवंतांच्या पाठीवर शाबासकीची थाप दिली व पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. शालेय पातळीवर व कॉलेज जीवनामध्ये अनेक विद्यार्थ्यांच्या गुणांना व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी देशाचे पंतप्रधान ना.नरेंद्र मोदी हे नेहमी विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपली कला कौशल्य दाखविण्यास प्रोत्साहन देत असतात. देशाच्या पंतप्रधानाच्या कार्याचा हाच आदर्श समोर ठेवून आमदार समाधान आवताडे यांनी पंढरपूर व मंगळवेढा दोन्ही तालुक्यातील गुणवंत विद्यार्थ्यांना रोख रक्कमेच्या स्वरूपामध्ये बक्षीस देऊन त्यांना गौरविण्यात आले.



# सोलर वीज ग्राहकांची संख्या वाढली

## राज्यात ७६,८०८ ग्राहक वापरतात १ हजार ३५९ मेगावॅट वीज

सुराज्य/सोलापूर

**घराच्या छपरावर सौरऊर्जा निर्मिती पॅनेल्स बसवून निर्माण झालेली वीज स्वत: वापरायची आणि जास्त निर्मिती झाली तर महावितरणला विकायची या 'रूफटॉप सोलर', योजनेला महावितरणच्या योजेना मोठा प्रतिसाद मिळत आहे. राज्यातील ७६ हजार ८०८ ग्राहक १ हजार ३५९ मेगावॅट इतकी वीज वापरत आहेत. विद्युत निर्मिती क्षमता महावितरणची वाढली असल्याची माहिती महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी दिली.**



राज्यामध्ये पाच वर्षांपूर्वी २०१६ -१७ या आर्थिक वर्षात केवळ १ हजार ७४ ग्राहक २० मेगावॅट सौरऊर्जा रूफ टॉप पद्धतीने निर्माण करत होते. गेल्या पाच वर्षांत त्यामध्ये मोठी वाढ झाली आहे. एकूण ग्राहकांची संख्या ७६ हजार ८०८ झाली आहे तर सौरऊर्जा निर्मितीची क्षमता १,३५९ मेगावॅटवर पोहोचली आहे.

२०२१-२२ या आधीच्या आर्थिक वर्षात राज्यातील रूफ टॉप सोलर' योजनेत सौरऊर्जा निर्मितीच्या बाबतीत एक हजार मेगावॅटचा टप्पा ओलांडला गेला. त्यानंतर चालू आर्थिक वर्षात एप्रिल महिन्यापासून वाढत्या संख्येने ग्राहक सौरऊर्जा निर्मितीसाठी रूफ टॉप सोलरला पसंती देत आहेत.

गेल्या दहा महिन्यात राज्यात घरावर सौर ऊर्जा निर्मिती संच बसविणाऱ्या ग्राहकांची संख्या २०,७२२ ने वाढली आहे तर या प्रकारची सौर ऊर्जा निर्मिती क्षमता ३३१ मेगावॅटने वाढली आहे.

सौरऊर्जा निर्मितीसाठी रूफ टॉप सोलर योजनेत ग्राहकांना केंद्र सरकारकडून मोठे अनुदान मिळते. तीन किलोवॅटपर्यंत क्षमतेचे पॅनेल बसविण्यासाठी सुमारे एक लाख वीस हजार खर्च येतो व त्यामध्ये अंदाजे ४८,००० रुपये म्हणजे ४० टक्के अनुदान मिळते. यामुळे ग्राहकाला जवळपास ७२,००० रुपये खर्च येतो. सौरऊर्जेतून निर्माण होणाऱ्या वीजेमुळे ग्राहकाला नेहमीचा वीजपुरवठा कमी वापरावा लागतो व वीजबिलात कपात होते.

ग्राहकाच्या सौर पॅनेलमधून त्याच्या वापरापेक्षा जास्त वीज निर्माण झाली तर ती महावितरणच्या ग्रीडमध्ये पाठवली जाते व कंपनी त्या विजेच्या मोबदल्यात वीजबिलात सवलत देते. यातून कधी कधी ग्राहकांना शून्य रकमेचे वीजबिलही येते. सोलर पॅनेल बसविण्याचा खर्च चार ते पाच वर्षांत भरून निघतो पण त्याचा उपयोग पंचवीस वर्षे होत राहतो. सौर ऊर्जानिर्मितीसाठी ग्राहकांनी ३ किलोवॅट ते दहा किलोवॅट क्षमतेचे पॅनेल्स बसविले तर वीस टक्के अनुदान मिळते. घरगुती ग्राहकांना सुविधा हे या योजनेचे मुख्य उद्दिष्ट आहे.



## नूतन पो. नि. स्वामी यांची हैद्रा येथील दर्ग्यास भेट

**सुराज्य/अक्कलकोट :** अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्याचे नूतन पोलीस निरीक्षक महेश स्वामी यांनी नुकतेच हैद्रा येथील हिंदू-मुस्लीम भाविकांचे श्रद्धास्थान असलेले हजरत ख्वाजा हाजी सैफुल मुलुक दर्गाह येथे भेट देत दर्शन घेतले. याप्रसंगी हजरत ख्वाजा हाजी सैफुल मुलुक दर्गाह ट्रस्टच्यावतीने त्यांचा दर्गाह ट्रस्टींचे चेअरमन मिरासाब याकुबसाब मुजावर व व्हा.चेअरमन रफिक शिराजोद्दीन मुजावर यांच्या हस्ते शाल श्रीफळ, हार, फेटा बांधून व प्रतिमा देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. स्वामी म्हणाले की, 'हैद्रा येथील हिंदू-मुस्लीम भाविकांचे श्रद्धास्थान असलेले हजरत ख्वाजा हाजी सैफुल मुलुक दर्गाह ट्रस्टींचे कार्य कौतुकास्पद आहे. यावेळी चेअरमन मिरासाब याकुबसाब मुजावर व व्हा. चेअरमन रफिक शिराजोद्दीन मुजावर, सेक्रेटरी बंदेनवाज मुजावर, वकील मुजावर, अ. रऊफ मुजावर, म. याकुबसाब मुजावर, अहमद मुजावर, बंदेनवाज शिराजोद्दीन मुजावर आदी उपस्थित होते.



## वेळापूर इंग्लिश स्कूलमध्ये स्कूल कमिटीची सभा संपन्न

**सुराज्य/वेळापूर :** (ता. माळशिरस) येथे वेळापूर इंग्लिश स्कूल प्रशाला वेळापूर जुनिअर कॉलेज व शिवतेज प्राथमिक शाळा वेळापूर या प्रशालेची स्कूल कमिटीची सभा उत्साहात झाली. यावेळी प्रशालेच्यावतीने दलित मित्र कदम गुरुजी सायन्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. सुभाष कदम यांच्या हस्ते झारखंड रांची येथे झालेल्या खेलो इंडिया वुमन्स लीग अंडर १४ प्रो अल्टिमेट खो-खो स्पर्धेत प्राजक्ता सोमनाथ बनसोडे हिने महाराष्ट्र खो -खो संघाचे कर्णधारपद भूषवून संघाला सुवर्णपदक मिळवून दिल्याबद्दल तिचा सन्मान करण्यात आला. स्कूल कमिटीच्या सभेला स्कूल कमिटी चेअरमन प्रतापराव पाटील, राम नेहरवे, माजी मुख्याध्यापक रामचंद्र पाचपुंड, मुख्याध्यापक रमेश पवार, उपमुख्याध्यापक सुनील खंदारे, पर्यवेक्षक पठाण शिवशरण, अवताडे, शिवतेज प्राथ. विभागाच्या मुख्याध्यापिका गायकवाड, शिक्षकेतर प्रतिनिधी विजय लकडे, गोपाळआबा क्षीरसागर आदी उपस्थित होते.



## चैतन्य ग्रामीण बिगर शेती पतसंस्थेच्या चेअरमनपदी देशमुख

**सुराज्य/पिलीव :** पिलीव येथील चैतन्य ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेच्या चेअरमन व व्हा. चेअरमन निवडी निवडणूक निर्णय अधिकारी राऊत यांच्या अध्यक्षतेखाली झाली. चेअरमन पदासाठी रामचंद्र उर्फ नानासाहेब देशमुख यांची तर व्हा. चेअरमन पदासाठी शोभा संजय रोकडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी नुतन संचालक आरिफखान पठाण, प्रभाकर वाघमारे, विठ्ठल भिसन, ऐश्वर्या देशमुख, प्रदीप चोबे, क्षितीजा गुळभिले, तुकाराम पडळकर, विशाल पिसे, जगन्नाथ करडे उपस्थित होते. निवडीवेळी माजी चेअरमन मिलींद गुळभिले, प्रकाश घाटे, माजी सरपंच अमोल मदने, नामदेव देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष कुमार भैस, कल्याण जावळे, दत्तात्रय भैस, मिनाक्षीदेवी देशमुख, सचिन भैस, अशोक बगाडे, राजेंद्र लोखंडे, कुबेर भैस, अमीनखान पठाण, संतोष पडळकर, माजी उपसरपंच मोहन करांडे, संजय रोकडे, महादेव तावरे, महादेव वाघमारे, मौला मुलाणी, सुरज कस्तुरे उपस्थित होते.

# कुर्डूवाडी जनता सहकारी बँकेची निवडणूक जाहीर

सुराज्य/कुर्डूवाडी

येथील जनता सहकारी बँकेचे पंचवार्षिक १५ जागांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात झाली असून अनेक राजकीय पक्षांचे या बँकेच्या निवडणूक लढवण्यासाठी तयारी सुरू झाल्याचे चित्र दिसत आहे. या निवडणुकीत राजकीय रंगही मोठ्या प्रमाणात चढणार असल्याचे यावर्षीही दिसून येणार आहे.

जनता सहकारी बँक कुर्डूवाडीच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्यासाठी २७ जानेवारी ते २ फेब्रुवारीपर्यंत सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत, उमेदवारी अर्ज छाननी ३ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजल्यापासून छाननी संपेपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी ६ फेब्रुवारी २० फेब्रुवारी पर्यंत सकाळी ११ ते ३ वाजेपर्यंत, उमेदवारी चिन्ह वाटप २१ फेब्रुवारी रोजी सकाळी ११.३० वाजता व मतदान ५ मार्च रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत तर मतमोजणी ६ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वाजता सुरू होईल. ही सर्व प्रक्रिया माढा येथील सहाय्यक निबंधक सहकारी संस्था येथील कार्यालयात पार पडणार आहे. यामुळे या निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

या १५ जागांसाठी सर्वसाधारण गट १०, अनुसूचित जाती/जमाती १, महिला २, इतर मागास वर्गीय १, भटक्या विमुक्त जाती/जमाती विशेष मागास प्रवर्ग १ असे एकूण १५ जागांसाठी निवडणूक होणार आहे.

### न. पा. निवडणुकीसाठी साटेलोटे

कुर्डूवाडी जनता सहकारी बँकेची निवडणूक नेहमीच चर्चेत राहिले आहे. निवडणूक झाल्यानंतरही पाच वर्षे कोणत्या ना कोणत्या विषयावर चर्चेत राहत असते. आमदार शिंदे बंधूंच्या गटातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे बँकेवर वर्चस्व असल्याची वारंवार चर्चा होत असते तर अनेक वेळा शिवसेना निवडणुकीमध्ये सहभागी होण्यासाठी रणनीती आखत असते. मात्र, अद्याप त्यांना यश मिळाले नाही. या बँकेच्या निवडणुकीसाठी नगरपालिका निवडणुकीत जोडले जाते. यामुळे या बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीत शिवसेनेने अद्याप कोणती हालचाल दिसत नसल्याचे चित्र आहे. आगामी नगरपालिका निवडणुकीसाठी बँकेच्या निवडणुकीत साटे-लोटे होण्याची शक्यता असल्याची चर्चा जोर धरत आहे.

## विज्ञान प्रदर्शनातून विद्यार्थी मोठे होऊन देशाला पुढे नेतील : आ. सातपुते

**सुराज्य/नातेपुते :** विद्यार्थ्यांनी केलेले विज्ञान प्रदर्शन पाहिले तर छोट्या-छोट्या विज्ञान प्रदर्शनातून हे विद्यार्थी मोठे होऊन आपल्या देशाला पुढे जाऊन वैज्ञानिक देतात व या गोष्टींमुळे त्यांची चिकित्सक, संशोधक वृत्ती निर्माण होते, असे प्रतिपादन आमदार राम सातपुते यांनी केले. ते नातेपुते येथील समता शिक्षण प्रसारक मंडळ समता इंग्लिश मेडियम स्कूल या ठिकाणी स्नेहसंमेलन कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

सातपुते म्हणाले की, 'समता इंग्लिश मीडियम स्कूलसाठी मी प्रशस्त अशी संगणक लॅब जाहीर करतोय या शाळेच्या विकासासाठी शाळेचे चेअरमन ॲड. बी. वाय. राऊत यांनी नुसता शब्द टाकावा तो आम्ही तत्पर पूर्ण करू ही शाळा माझी आहे. या शाळेचा विकास व्हावा म्हणून ही शाळा मी दत्तक घेतोय. शाळेला कधीही काही कमी पडू देणार नाही. आपण भारतीय विकासासाठी खूप मोठ्या गोष्टी करत असतो. परंतु त्याची सुरुवात लहान गोष्टींमधून होत असते आणि हे समता विद्यालयाने करून दाखवले आहे. कार्यक्रमासाठी संस्कृती सातपुते, सोलापूर जिल्हा नियोजन समितीचे के. के. पाटील, गटशिक्षण अधिकारी धनंजय देशमुख, नातेपुते नगरपंचायतीचे मुख्याधिकारी माधव खांडेकर, नगरसेवक राजेंद्र उराडे, रणजीत पांढरे, ॲड. रावसाहेब पांढरे, दिपक काळे, विकास सोसायटीचे अजय पांढरे, रेणुका पतसंस्थेचे चेअरमन अर्जुन जठार, सावता बोराटे, विनायक सुर्वे, रविंद्र प्रसाद, नगरसेविका माया ऊराडे, शर्मिला चांगण, सविता बरडकर, समता इंग्लिश मीडियम स्कूल चेअरमन तथा नगरसेवक ॲड. बी. वाय. राऊत, सचिव सुनील राऊत, लिलावती राऊत, सुमित्रा राऊत, पूनम राऊत, प्रवीण काळे, नंदन दाते, प्रेम देवकाते आदी उपस्थित होते. प्रास्ताविक मुख्याध्यापिका नायकवडे यांनी केले तर आभार ॲड. रावसाहेब पांढरे यांनी मानले.

## युवासेनेतर्फे संगम शाळेस मदतीचा हात

**सुराज्य/अकलूज :** युवासेना जिल्हा प्रमुख गणेश इंगळे व शिवसैनिक रज्जाक मुलाणी यांच्यावतीने संगम जिल्हा परिषद शाळेस वह्या कंपास आणि पाटी वाटप करण्यात आले. यावेळी हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन शिवसेना महिला आघाडी जिल्हा प्रमुख पूनम अभंगराव, युवासेना उपजिल्हाप्रमुख सोनू पराडे पाटील व तालुका प्रमुख सुभाष काकडे यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी आगतराव पराडे, रमेश इंगळे, बाळासाहेब जाधव, विश्वास ताटे-देशमुख, रमेश काकडे, भूषण पराडे, सतीश इंगळे.दुर्वा आडके, दत्ता साळुंखे डॉफ निलेश कांबळे यांच्या हस्ते साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी संभाजी ब्रिगेडचे सचिन पराडे, शिवसेना पंढरपूर शहर प्रमुख पूर्वा पांढरे, जयश्री इंगळे, निता इंगळे, अप्पा महाडिक, कल्याण इंगळे, लाव्हा पराडे, गणेश पराडे, गोविंद मिटकल, बबन पराडे, विकास भोई, दयानंद इंगळे, मोनू इंगळे, समीर शेख, शुभम भोई, प्रशांत पवार, साहेबराव पवार, राजू चमरे, राजू ठोकळे, सर्जेराव लावंड,आदी उपस्थित होते. यावेळी सर्व पदाधिकारी यांचे आभार मुख्याध्यापक भारत सलगर, विजय भोसले, सूरज शिर्के, विजय हेगडे, दत्तात्राय कदम यांनी मानले.

## अनु.जाती व बौद्ध घटकांच्या वस्त्यांचा विकास करण्याची; शेकापची मागणी

सुराज्य/सांगोला

सांगोला तालुक्यातील अनुसूचित जाती व नव बौद्ध घटकांच्या वस्त्यांचा विकास करावा अशी मागणी सांगोला तालुका शेतकरी कामगार पक्षाकडून अतिरिक्त मुख्य कार्य कारी अधिकारी जिल्हा परिषद सोलापूर यांचेकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

जिल्हा परिषदेस मिळतो जिल्हा परिषद असणाऱ्या तरतुदींनुसार स्थळ निश्चिती करते. सांगोला तालुक्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्त्यांच्या विकास करण्यासाठीचे तालुकास्तरावरून किंवा ग्रामपंचायतीने स्थळ निश्चिती करून दिलेल्या प्रस्तावांचा प्राधान्याने विचार करावा तसेच जिल्हा नियोजन समिती व जिल्हा परिषद सेस निधी मिळतो त्याचे वाटप गाव निहाय होते निवडून गेलेल्या लोकप्रतिनिधींनी शिफारस केलेल्या गावांना निधी द्यावा, सध्या जिल्हा परिषदेवर प्रशासक नियुक्त आहे.

म्हणून न्यायाची अपेक्षा करणे काही गैर नाही शेतकरी कामगार पक्षाने कायदेशीर केलेल्या सर्व विकास कामांचा आपण विचार करावा अशी अपेक्षा निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदन देते प्रसंगी ज्येष्ठ नेते चंद्रकांत देशमुख, पुरोगामी युवक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ. बाबासाहेब देशमुख, बाबासाहेब करांडे, दादासाहेब बाबर, संगम धांडोरे, माजी सभापती बाळासाहेब काटकर, माजी उपसभापती संतोष देवकते, गजेंद्र कोळेकर यांचे सह विविध गावचे सरपंच, पदाधिकारी उपस्थित होते

## बुर्ला महिला महाविद्यालयातील स्कील इंडिया युनिटचे यश

**सुराज्य/सोलापूर :** पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात केंद्र सरकारचे स्किल इंडिया युनिट कार्यरत आहे. या युनिटला केंद्र सरकारच्या स्किल इंडियाकडून फोर स्टार मानांकर प्राप्त झाले आहे. या युनिटमध्ये पाच कोर्स सुरु आहेत. यामध्ये ५४० विद्यार्थिनी सहभागी आहेत. महाविद्यालयातील सोयी-सुविधा विद्यार्थिनींचा कौशल्य विकास व वक्तशीरपणा या बाबी विचारात घेऊन हे मानांकन देण्यात आले आहे.

महाविद्यालयाच्या या यशाचे संस्थेचे अध्यक्ष काशीनाथ गड्डम, उपाध्यक्ष प्रा. श्रीनिवास कोंडी, सचिव दशरथ गोप, सहसचिवा संगीता इंदापुरे, खजिनदार नागनाथ गंजी, विश्वस्त मंडळ, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचारी वर्ग यांनी अभिनंदन केले आहे. या उपक्रमासाठी प्रा. डॉ. रजनी दळवी, स्किल इंडियाच्या समन्वयक सोनाली साळुंखे, संदीप साखरे, संतोष पाटील, सचिन लवंगे, केदार हणमगोंडा यांचे सहकार्य लाभले. तर महाविद्यालयात हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी समन्वयक प्रा. डॉ. रजनी दळवी, आयक्यूएसीच्या समन्वयक प्रा. डॉ. ॲनी जॉन, प्रा. डॉ. शिवानंद भांजे, प्रा. अशोक एक्कलदेवी, प्रा. डॉ. पंचप्पा वाघमारे यांनी परिश्रम घेतले.

## कत्तलखान्याकडे जाणारी १० जनावरे ताब्यात, तिघांना अटक

### पानगाव-उस्मानाबाद रस्त्यावरील घटना

सुराज्य/बार्शी

उस्मानाबाद येथील कत्तलखान्यात जर्सी गायी व इतर जनावरे बार्शी तालुक्यातील पानगावमार्गे घेऊन जाणाऱ्या टेम्पोस तालुका पोलिसांनी अडवून १० जनावरांसह तीन आरोपींना अटक करून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २६ रोजी पहाटेच्या सुमारास उडकिस आली. याबाबत पो. कॉ. सचिन नितनात यांनी तालुका पोलिसात तक्रार दिली.


सोलापूर ग्रामीण कक्षाकडून आयशर टेम्पोतून ही जनावरे पानगावमार्गे उस्मानाबाद कतलखान्याकडे जात असल्याचे तालुका पोलिसांना कळविताच सपोनि महारुद्र परजने पो. ना. अरुण डुकळे, पो. कॉ. भोसले, पो. कॉ. पठाण यांनी जाऊन पहाणी करताना टेम्पो रस्तापूरमार्गे गेल्याची माहिती कळली. त्यांनी पाठलाग करून तो बावी येथे जाऊन टेम्पो अडवला. तपास पो. कॉ. अरुण डुकळे करीत आहेत. गुलाब शेख (वय ३१), रजाक महेबूब शेख (वय २५ दोघे रा. आसू ता. फलटण), सूरज रशीद शेख (वय २७, रा. उस्मानाबाद) यांना अटक करून टेम्पोतील जनावरांची तपासणी करत असताना त्यात ९ जर्सी गायींतील एक गाय व एक बैल मयतावस्थेत दिसला.

आरोपींवर प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम, महाराष्ट्र पशुसंरक्षण कायद्यानुसार अटक करून गुन्हा दाखल करण्यात आला. ताब्यात घेतलेल्या गायी पोलिसांनी तातडीने नवकार जैन सेवातीर्थ अलिपूर येथील गोशाळेत सोडली.

# सहकार महर्षी गणपतराव साठे यांचे सहकार क्षेत्रात मोठे योगदान : पाटील

सुराज्य/माढा

**शिक्षणासह सार्वजनिक जीवनात अवर्णनीय असे काम सहकार महर्षी गणपतराव साठे यांनी केले आहे. माढा शहरातील कोर्ट-कचेरी, शाळा कॉलेज यासारख्या अनेक गोष्टी केवळ गणपतराव साठे यांच्यामुळे येऊ शकल्या. त्या काळात या सर्व कार्यासह सहकार क्षेत्रातील मोठ्या योगदानामुळेच माढा तालुक्याचा संपूर्ण जिल्ह्यात दबदबा होता, असे मत श्री संत कूर्मदास साखर कारखान्याचे माजी व्हा. चेअरमन शिरिषकुमार पाटील यांनी व्यक्त केले.**



माढ्यातील स. म. गणपतराव साठे जि. प. प्रशालेत जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी जि. प. सदस्य झुंजार नाना भांगे होते. यावेळी किसान काँग्रेसचे प. म. अध्यक्ष प्रा. संदीप साठे नगरसेवक तथा लोकमंगल पतसंस्थेचे संचालक शहाजी साठे मुख्याध्यापक नागेश खेडकर शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष धैर्यशील भांगे, प्रमोद साठे, भैय्या खरात, समीर सापटणेकर, के. डी. यादव उपस्थित होते.

यावेळी स. म. गणपतराव साठे यांच्या जयंतीनिमित्त नगरसेवक शहाजी साठे यांच्यावतीने प्रशालेच्या ग्रंथालयास ग्रंथपाल गणपत जाधव यांच्याकडे ग्रंथ भेट स्वरूपात देण्यात आले.


झुंजार भांगे यांनी प्रशालेच्या गुणवत्तेचे कौतुक करताना स्पर्धेच्या युगात सरकारी शाळा असतानाही सर्वांच्या सहकार्याने या शाळेने यशाची परंपरा कायम जोपासावी, आमदार बबनराव शिंदे यांच्या माध्यमातून आवश्यक ती सर्व मदत करण्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली. प्रास्ताविकातून मुख्याध्यापक नागेश खेडकर यांनी शाळेच्या प्रगतीचा आढावा सांगितला. सूत्रसंचालन लक्ष्मण राऊत यांनी तर आभार शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष धैर्यशील भांगे यानी केले.

# वेळापूर येथे प्रजासत्ताक दिन साजरा

## तंटामुक्त समिती अध्यक्षपदी युवराज मंडले

सुराज्य/वेळापूर

**वेळापूर येथे प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ध्वजाची पूजा व ध्वजारोहण सरपंच रजनीश बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपसरपंच तानाजी चव्हाण, ग्रामपंचायत सदस्य संजय आबा मंडले, नाना मुंगुस्कर, हनुमंत वायदंडे, दीपक राऊत, अमृतराज माने-देशमुख, रवीराज गायकवाड, शिवाजी पनासे, नयन माने, विमल जाधव, छाया साठे, सिमरन मुलाणी, अंजना माने उपस्थित होते.**



जि. प. शाळा यांच्यावतीने सांस्कृतिक कार्यक्रमांचे अयोजन करण्यात आले होते. यानंतर ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामसभेच्या अध्यक्षपदी सरपंच रजनीश बनसोडे होते, तर सचिव म्हणून धनाजी धांडोरे यांनी काम पाहिले. यावेळी ग्रामसभेमध्ये विविध विषयांवर चर्चा झाली.

यावेळी महात्मा गांधी तंटामुक्ती समितीची नवीन कार्यकारणी निवडण्यात आली. यामध्ये तंटामुक्ती समितीच्या अध्यक्षपदी युवराज मंडले यांची तर उपाध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला जिल्हा उपाध्यक्षा अश्विनी उमेश भानवसे सर्वानुमते निवड करण्यात आली.

यावेळी सरपंच रजनीश बनसोडे, उपसरपंच तानाजी चव्हाण, ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य तसेच माजी जि. प. सदस्य बाळासाहेब धाईंजे, जीवन जानकर बहुजन मुक्ती पार्टीचे राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य काकासाहेब जाधव, रिपाइं माळशिरस तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे, माजी सैनिक भिमराव इंगोवले, अशोक बनसोडे माजी उपसरपंच जावेद मुलानी महेंद्र साठे, दत्तात्रय चंदनशिव, विजयभाऊ बनसोडे, आप्पाराव कांबळे, काशिनाथ आडत, निवृत्ती भुसारे, सुखदेव आडत, शंकर आडत, नागेश क्षीरसागर, जवान माने-देशमुख, सुनील साठे, शिवाजी मंडले, अमोल साठे, प्रदीप सरवदे, अजित साठे, रणजित सरवदे, शरद साबळे, संजय पनासे, राहुल सराटे, श्याम मंडले, दादा मंडले, दत्ता येडगे, दीपक चव्हाण, स्वप्निल सरवदे, ग्रामविकास अधिकारी सचिन बनकर आदी उपस्थित होते.

## आयकर विभागातील

# सामान्य कर्मचाऱ्याने २६३ कोटी रुपये लाटले

✔ सुराज्य/मुंबई

**अलिकडच्या काळात एखादा राजकारणी, उद्योगपती किंवा व्यावसायिकांवर आयकर विभाग किंवा ईडीची धाड पडण्याच्या घटना या काही नवीन बाब राहिलेली नाही. एकदा का या यंत्रणांचा ससेमिरा मागे लागला की आयकर विभाग आणि ईडी संबंधित व्यक्तीच्या संपत्तीची पाळेमुळे खणून काढतात. या सगळ्या चौकशीतून कोणत्या उद्योगपतीने किंवा व्यापाऱ्याने कशाप्रकारे करचोरी केली आहे, याच्या रंजक कथाही समोर येतात. मात्र, नुकत्याच समोर आलेल्या एका प्रकरणात आयकर विभागाच्याच एका कर्मचाऱ्याने सरकारला थोडाथोडका नव्हे २६३ कोटींचा चुना लावल्याचा प्रकार समोर आला आहे. तानाजी मंडल अधिकारी असे या कर्मचाऱ्याचे नाव आहे. तानाजी अधिकारी हे आयकर खात्यात वरिष्ठ सहाय्यक पदावर कार्यरत आहेत. त्यांनी आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे लॉग इन वापरुन टॅक्स रिफंडच्या माध्यमातून प्रचंड भ्रष्टाचार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.**

--------------------




आयकर विभागाच्या या कर्मचाऱ्याने आपल्या वरिष्ठांशी गोड बोलून त्यांचा विश्वास जिंकला. अगदी आयकर खात्यातील आयुक्त स्तरावरील अधिकारीही तानाजी अधिकारी यांच्याशी गोडीगुलाबीने वागत. याच विश्वासाचा गैरफायदा घेत तानाजी अधिकारी यांनी आयकर खात्यातील आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची कार्यालयातील लॉग इन्स आणि पासवर्ड मिळवले. याच लॉग इनचा वापर करुन तानाजी अधिकारी खोटे कर परतावे अर्थात टॅक्स रिफंड करत असे. तानाजी अधिकारी आपल्या सहकाऱ्यांना खोटे टॅक्स रिफंड क्लेम दाखल करायला सांगत असे आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या लॉग इनवरुन ते मंजूर करुन टाकत असे. या माध्यमातून तानाजी अधिकारी यांनी थोडथोडके नव्हे तब्बल २६३ कोटी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार केला.

याप्रकरणी सक्तवसुली संचलनलायाने शनिवारी मुंबई आणि कर्नाटकमध्ये काही ठिकाणी छापेमारी केली. ईडीने जवळपास ३० मालमत्तांवर छापे टाकले. याशिवाय, ईडीकडून तानाजी अधिकारी यांनी खोट्या कर परताव्याच्या (Tax Refund) माध्यमातून जमवलेल्या पैशातून खरेदी केलेले ३२ प्लॉटसही जप्त केले आहेत. तानाजी अधिकारी यांनी या पैशातून लोणावळा, खंडाळा, कर्जत, पुणे, उडपी याठिकाणी अनेक मालमत्ता खरेदी केल्या होत्या. याशिवाय, मुंबई आणि पनवेलमध्ये त्याच्या मालकीचे काही फ्लॅटस होते. तसेच तानाजी अधिकारी यांच्याकडे BMW X7, Mercedes GLS400d, udi Q7 या अलिशान गाड्या होत्या. तानाजी अधिकारी यांनी या सर्व मालमत्ता त्याचे सहकारी असलेल्या भुषण पाटील, राजेश शेट्टी, सारिका शेट्टी, किर्ती वर्मा आणि अन्य काही लोकांच्या नावाने विकत घेतल्या होत्या. ईडीने याप्रकरणात आतापर्यंत केलेल्या कारवाईत एकूण १६६ कोटींची मालमत्ता गोठवली आहे.




**तानाजी अधिकारी घोटाळा नेमका कसा करायचा?**

तानाजी अधिकारी या कर्मचाऱ्याने आपल्या वरिष्ठांचा विश्वास संपादन केला होता. याच विश्वासाचा गैरफायदा घेऊन तानाजीने वरिष्ठ अधिकाऱ्यांची लॉग इन आणि पासवर्ड मिळवले. तो आपल्या सहकाऱ्यांना आयकर विभागाकडे खोटे टीडीएस रिफंड क्लेम दाखल करायला सांगायचा. सहकाऱ्यांनी खोटे रिफंड क्लेम सादर केल्यानंतर तानाजी वरिष्ठ अधिकाऱ्यांचे लॉग वापरुन ते क्लिअर करत असे. ही कर परताव्याची रक्कम एस.बी. एन्टरप्रायझेस या बनावट कंपनीच्या बँक खात्यात जमा केली जात असे. हे बँक खाते तानाजीचा सहकारी भूषण पाटील हाताळत होता, अशी माहिती ईडीने दिली.

तानाजी अधिकारी याने नोव्हेंबर २०१९ पासून वर्षभरात १२ खोटे टॅक्स रिफंड क्लेम मंजूर केले. या सर्व टॅक्स रिफंडच्या माध्यमातून जवळपास २६३ कोटी रुपये तानाजीने एस.बी. एन्टरप्रायझेसच्या बँक खात्यात वळते केले. २००७-०८ आणि २००८-०९ या आर्थिक वर्षातील टॅक्स रिफंड बाकी असल्याचे दाखवून तानाजी अधिकारी याने २६३ कोटींचा आर्थिक गैरव्यवहार केला.

---

# पांढऱ्या सोन्याला येवू लागलाय 'भाव'

अकोला : सोलापूरच्या मार्केट यार्डात सोलापूरसह बाहेरून आलेला कांदा भाव केव्हा खाणार? अशी प्रतिक्षा कांदा उत्पादकांना लागलेली असतानाच तिकडे कापूस पंढरीत पांढ्या सोन्याला मात्र चांगलाच भाव येतो आहे. विदर्भातील कापसाची पंढरी समाजाल्या जाणाऱ्या अकोला जिल्ह्यातील अकोटच्या कृषी उत्पन्न बाजार समितीत कापसाच्या भावात किंचित वाढ झाली.शुक्रवारच्या भावाच्या तुलनेत शनिवारी ६० रुपयांनी कापसाच्या दरात वाढ झाली असून ८ हजार १०० पासून ८ हजात ६६० रूपयांप्रमाणे पांढ्या सोन्याला भाव मिळाला. दरम्यान तरीही कापसाच्या भावात अपेक्षानुसार वाढ न वाढल्याने अद्यापही शेतकऱ्यांनी घरात ६० ते ६५ टक्के कापूस साठवून ठेवल्याचे सांगण्यात येते.



मागील महिन्यात म्हणजेच डिसेंबरच्या सुरुवातीला अकोटच्या बाजारात कापसाला ९ हजार १०० इतका कापसाला भाव होता. यामध्ये भावात सातत्याने चढउतार पाहायला मिळत आहे. शुक्रवारी ८ हजार ६०० रुपयांदरम्यान कापसाला भाव मिळाला. तर शनिवारी या भावात ७० रुपयांनी वाढ होऊन आता ८ हजार १०० पासून ८ हजात ६६० रूपयांपर्यत आले. बाजार समितीत ३ हजार २०० क्विंटल कापूस खरेदी झाला आहे.

राज्यात अद्यापही हवा तसा कापूस शेतकऱ्यांनी बाजारात आणला नाही. याचं कारण म्हणजे कापसाला मिळत असलेला भाव हे आहे. कापसाच्या गाठीसह आंतरराष्ट्रीय बाजारातील कापूस दरात चढउतार होत आहे. त्यामुळ कापसाच्या भावातही सातत्याने घसरण होत आहे. आज कापसाच्या भावात थोडीशी वाढ झाली. परंतु शेतकऱ्यांच्या अपेक्षाप्रमाणे कापसाला भाव नसल्याने शेतकरी चिंतेत आहेत.

सरकारने आयतीवर बंदी घालून आयात शुल्क वाढवायला पाहिजे, जेणेकरून शेतकऱ्यांच्या कापसाला भाव मिळेल, असं सांगण्यात आलं आहे. सरकारच्या चुकीचे धोरणांमुळे आज शेतकऱ्यांसमोर मोठ्या अडचणी उभ्या आहेत. सरकारने आयात बंदी केल्यास अथवा त्यावर शुल्क वाढवल्यास देशातील शेतकऱ्यांना मोठा फायदा होऊ शकतो. आजवर शेतकऱ्यांच्या कापसाच्या भावात ७० कधी शंभर तर कधी दोनशे रुपयांनी वाढ होते. हा यावरचा तोडगा नाही यासाठी सरकारने तातडीने यावर निर्णय घ्यायला पाहिजे असं मत शेती अभ्यासक तथा शेतकरी नेते प्रशांत गावंडे यांनी सांगितले.

### आंतरराष्ट्रीय बाजारात दररोज चढ-उतार

आंतरराष्ट्रीय बाजारात दररोज चढ-उतार होत आहेत, त्यामुळे कापसाच्या भावात काही रुपयांनी वाढ होते तर कधी यामध्ये घसरण पाहायला मिळत आहे, तरीही गेल्या दोन दिवसांमध्ये झालेल्या कापसाच्या भाव वाढ पाहता, कापसाच्या भावात पुन्हा वाढ होण्याची शक्यता आहे, तरी हा फक्त अंदाज असल्याचे समजते. सद्यस्थितीत अकोटच्या बाजारात १३० क्विंटलहून अधिक कापूस खरेदी झाला आहे. तरीही ६० टक्के जवळपास कापूस घरात साठवून आहे, अशी माहिती अकोट कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव सुधाकर दाळू यांनी दिली.

---

## नद्यांसाठी कर्जरोखे

# पुनरुज्जीवनासाठी २०० कोटी रुपये उभारणार

✔ सुराज्य/पुणे

**पिंपरी - चिंचवडमधून वाहणाऱ्या पवना आणि इंद्रायणी या नद्यांचे पुनरुज्जीवन प्रकल्पासाठी दोनशे कोटी रुपयांचे कर्जरोखे उभारण्यास राज्य सरकारने मान्यता दिली आहे. त्यामुळे प्रकल्पाला गती मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.**

राज्य सरकारच्या नगरविकास विभागाचे उपसचिव श्रीकांत आंडगे यांनी या संदर्भात शासन निर्णयाची प्रत पालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी पाठविली आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवडमधून वाहणाऱ्या पवना व इंद्रायणी नद्यांच्या पुनरुज्जीवनासाठी प्रकल्प राबविण्यात येणार आहे. त्यासाठी सुमारे दोन हजार ७५७ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. प्रकल्पाच्या खर्चासाठी पालिकेच्या स्थायी समितीने यापूर्वीच मंजुरी दिली आहे. त्यानंतर सर्वसाधारण सभेने पवना नदी प्रकल्पासाठी एक हजार ५५७ कोटी रुपये, तर इंद्रायणी नदी प्रकल्पासाठी एक हजार २०० कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकीय खर्चास मंजुरी दिली आहे.



या खर्चाला अनुसरून प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यासाठी दोनशे कोटी रुपयांपर्यंत कर्जरोखे उभारण्यास राज्य सरकारने मान्यता द्यावी, असा प्रस्ताव तत्कालीन आयुक्तांनी १८ ऑक्टोबर २०२१ रोजी राज्य सरकारकडे पाठविला होता. त्याला काही अटींवर मान्यता देण्यात आली आहे, असे स्पष्ट करण्यात आले.

रोख्यांद्वारे उभारण्यात येणारी कर्ज रक्कम व त्यावरील व्याज याची परतफेड करण्याची जबाबदारी पूर्णतः पालिकेवर राहणार आहे. त्या संदर्भात सरकार कोणतीही हमी घेणार नाही. राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडून परतफेड होण्याबाबत दक्षता घ्यावी, याकडे लक्ष वेधले आहे.

सरकारच्या संबंधित विभागांनी निश्चित केलेले नियम, अटी यांची पूर्तता केल्यानंतरच पुढील आवश्यक कार्यवाही करणे आयुक्तांना बंधनकारक राहील, असे नमूद केले आहे.

---

# कंगाल पाकिस्तानला आता 'अल्लाह'चा भरवसा

### पाक अर्थमंत्र्यांचे वक्तव्य

✔ सुराज्य/इस्लामाबाद

**पाकिस्तान आर्थिक गर्तेत सापडला असून तेथील सरकार आता 'अल्लाह'च्या भरवशावर आहे, असे दिसते. इस्लामच्या नावाने स्थापन झालेला पाकिस्तान हा एकमेव देश आहे. त्यामुळे त्याच्या विकास आणि समृद्धीची जबाबदारी 'अल्लाह'ची आहे, असे वक्तव्य पाकिस्तानचे अर्थमंत्री इशाक डार यांनी शुक्रवारी केले आहे.**

विदेशी गंगाजळी जवळपास आटलेली असल्याने आयातीची रक्कम कशी अदा करायची, या प्रश्नाने पाकिस्तान त्रस्त आहे. अशा परिस्थितीत देशातील जनतेची नाराजी कमी करण्यासाठी इशाक डार यांनी धार्मिक कार्ड खेळण्यास सुरुवात केली असल्याचे मानले जाते.येथे ग्रीन लाइन एक्स्प्रेस ट्रेन सेवेच्या उद्घाटन समारंभात पाकिस्तान मुस्लीम लीग-नवाझचे (पीएमएल-एन) ज्येष्ठ नेते इशाक डार यांनी उपस्थितांना संबोधित केले.

इस्लामच्या नावावर पाकिस्तानची निर्मिती झाल्यामुळे त्याची प्रगती होईल, असा मला विश्वास आहे. जर अल्लाह पाकिस्तानची निर्मिती करू शकतो, तर तो त्याचे संरक्षण, विकास आणि समृद्धीही करू शकतो, असे डार म्हणाले.

पंतप्रधान शहबाझ शरीफ यांच्या नेतृत्वाखाली पाकिस्तानची स्थिती सुधारण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत असल्याचे त्यांनी सांगितले.

---

# राज्याला महावितरणचा 'शॉक' बसणार

✔ सुराज्य/मुंबई

**जवळपास १५०० कोटी रुपयांचा तोट सहन करणाऱ्या 'महावितरण' कंपनीने आर्थिक भार वीज ग्राहकांवरच टाकण्याचा निर्णय घेतला आहे. यानुसार आगामी वीजदर आढाव्यात तब्बल ३७ टक्के दरवाढीचा प्रस्ताव कंपनीने महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडे सादर केला आहे. तर, सन २०२४-२५मध्ये आणखी १५ टक्के दरवाढ प्रस्तावित आहे. या प्रस्तावामुळे घरगुती, व्यावसायिक, शेतकरी अशा सर्वच श्रेणींना दरवाढीचा धक्का बसण्याची शक्यता आहे.**

वीज वितरण कंपन्यांचे ग्राहकांसाठीचे वीजदर पंचवार्षिक असतात; त्यानंतर या दरांचा मध्यकालीन आढावा घेतला जातो. सध्याचे दर एक एप्रिल २०२०पासून लागू झाले आहेत. त्यानुसार त्यांचा आता मध्यकालीन आढावा घेतला जात असून, हे दर या वर्षी एक एप्रिलपासून लागू होणार आहेत. त्या अंतर्गत 'महावितरण'ने भरमसाट दरवाढ प्रस्तावित केली आहे.



या नवीन दरांनुसार, घरगुती ग्राहकांचा सध्या असलेला किमान दर ३.३६ रुपये प्रतियुनिटवरून २०२३-२४साठी (एक एप्रिलपासून) ४.५० रुपये प्रतियुनिट होणार आहेत; तर सध्याचा ११.८६ रुपये प्रतियुनिट हा कमाल दर आता १६.६० रुपये प्रतियुनिट प्रस्तावित आहे.

या दोन्ही श्रेणींमधील सन २०२४-२५ साठीचा वीजदर अनुक्रमे ५.१० रुपये ते १८.७० रुपये प्रतियुनिट प्रस्तावित आहे. व्यावसायिक श्रेणीतील ग्राहकांसाठीचा सध्या असलेला किमान ७.०७ रुपये ते ९.६० रुपये प्रतियुनिटचा दर, आता १२.७६ रुपये ते १७.४० रुपये प्रतियुनिट इतका प्रस्तवित आहे. त्यापुढील वर्षासाठी हा दर किमान ११ रुपये ते कमाल २० रुपये प्रतियुनिट इतका प्रस्तावित आहे.

लघुदाब औद्योगिक श्रेणीतील हा दर आता ५.११ रुपये ते ६.०५ रुपये प्रतियुनिटवरून ६.९० ते ८.२० रुपये प्रतियुनिट प्रस्तावित आहे. उच्चदाब औद्योगिक श्रेणीतील ग्राहकांना आता सध्याच्या ६.८९ रुपये प्रतियुनिटवरून ९.३२ व त्यानंतरच्या वर्षी १०.५० रुपये प्रतियुनिट इतका असेल. लघु दाब श्रेणीतील शेतकऱ्यांसाठीचे दरदेखील किमान १.९५ रुपये ते कमाल ३.२९ रुपये प्रतियुनिटवरून २.७० रुपये ते ४.५० रुपये प्रतियुनिट करण्याबाबत नमूद आहे.

---

# एका दिवसात तीन लढाऊ विमानांचा भीषण अपघात

### सुखोई-३०, मिराज आणि मिग जळून खाक

✔ सुराज्य/नवी दिल्ली

**एका दिवसात हवाई दलाच्या तीन विमानांचे भीषण अपघात झाल्याची धक्कादायक घटना समोर येत आहे. राजस्थानच्या भरतपूर येथे हवाई दलाचे मिग हे लढाऊ विमान कोसळले तर मध्य प्रदेशच्या मुरैना येथे सुखोई ३० आणि मिराज हे दोन लढाऊ विमान कोसळले आहेत. या अपघातांची चौकशी सुरू असून तिन्ही लढाई विमानांची राखरांगोळी झाली आहे.**

मध्य प्रदेशच्या मुरैना जिल्ह्यातील पहाडगढच्या जंगलात सुखोई-३० आणि मिराज २००० हे दोन लढाऊ विमान अपघातग्रस्त झाले आहेत. आज पहाटे साडेपाच वाजण्याच्या सुमारास हे दोन्ही विमान कोसळले. परंतु, लढाऊ विमान कोसळल्याने भीषण आग लागली.



या आगीत दोन्ही विमाने जळून खाक झाली आहेत. दरम्यान, मिराज विमानातील एका पायलटचा मृत्यू झाला असून सुखोईतील पायलट सुरक्षित आहे.

---

## केंद्रीय मंत्र्याच्या भावाचेच हाल; उपचार न मिळाल्याने मृत्यू

✔ सुराज्य/नवी दिल्ली : केंद्रीय मंत्री अश्विनी चौबे यांचे धाकटे भाऊ निर्मल चौबे यांचे निधन झाले आहे. बिहारमधील भागलपूर येथील मायागंज रुग्णालयात त्यांचा मृत्यू झाला. निर्मल चौबे यांच्या मृत्यूनंतर रुग्णालय प्रशासनावर उपचारात हलगर्जीपणा केल्याचा आरोप त्यांच्या कुटुंबियांनी केला.

याप्रकरणी दोन डॉक्टरांना निलंबित करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, निर्मल चौबे यांना हृदयविकाराचा झटका आल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र त्यावेळी तेथे डॉक्टर नव्हते. परिणामी, त्यांची प्रकृती सतत खालावत होती. उपचारासाठी वेळ लागत असल्याने प्रकृती खालावत राहिली. संध्या. ६ वा.च्या सुमारास त्यांचा मृत्यू झाला.

---

# धीरेंद्रकृष्ण महाराज यांना पोलिसांचीच क्लिनचीट

✔ सुराज्य/नागपूर

मध्यप्रदेशातील बागेश्वरधामचे पीठाधिश्वर धीरेंद्र कृष्ण महाराज हे गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहेत. त्यामागील कारण म्हणजे नागपुरातील रेशीमबाग मैदानावर दिव्य दरबार आयोजित करण्यात आला होता. अशातच अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे उपाध्यक्ष शाम मानव यांनी बागेश्वर बाबांच्या दिव्य दरबाराबाबत आक्षेप घेत धीरेंद्र कृष्ण महाराज यांना थेट आव्हान दिले होते की, 'दिव्य शक्ती सिद्ध करा आणि ३० लाख रुपये बक्षीस मिळवा. या आव्हान आणि प्रतिआव्हानामुळे बागेश्वर महाराज जोरदार चर्चेत आले होते. श्याम मानव यांनी जे आव्हान दिले होते त्याला महाराष्ट्रातील कायद्याचा देखील आधार होता, मात्र, अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या तक्रारीनंतर नागपूर पोलिसांनी तपासानंतर धीरेंद्र कृष्ण महाराज आक्षेपार्ह कृत्य करत असल्याचं दिसत नसल्याचं म्हटलं आहे. श्याम मानव यांनी यानंतर नागपूर पोलिसांनी काढलेला निष्कर्ष हा त्यांनी काढलेला नसून कसल्यातरी अडचणीतून तो काढण्यात आल्याचं श्याम मानव म्हणाले.'



पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी आम्ही श्याम मानव यांच्या आरोपांबद्दल सखोल तपास केला. त्यासाठी धीरेंद्र कृष्ण महाराज यांच्या कार्यक्रमाचे सहा तासांपेक्षा जास्त व्हिडिओ फुटेज तपासले. मात्र, धीरेंद्र कृष्ण महाराज कुठलीही अंधश्रद्धा पसरवत आहेत आणि त्यांचे कृत्य जादूटोणाविरोधी कायदा अंतर्गत गुन्हा असल्याचे जाणवत नाही. त्यामुळे याप्रकरणी नागपूर पोलीस कुठलाही दखलपात्र गुन्हा दाखल करणार नाहीत, अशी माहिती नागपूरचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली आहे. यासंदर्भात अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक संघटक श्याम मानव यांना रीतसर माहिती दिली जाईल, असे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी बोलताना सांगितले.

नागपूर पोलिसांनी सात आणि आठ जानेवारी रोजी झालेल्या दिव्य दरबाराचे सहा तासांपेक्षा जास्त कालावधीचे व्हिडिओ फुटेज तपासले असून त्यामध्ये कुठेही धीरेंद्र कृष्ण महाराज अंधश्रद्धा पसरवत आहेत किंवा लोकांना जादूटोणा किंवा भूत बाधा संदर्भात प्रोत्साहित करत आहे असे जाणवत नाही. त्यामुळे याप्रकरणी कुठलाही दखलपात्र गुन्हा नोंदवता येत नाही, असे पोलीस आयुक्त कुमार म्हणाले. या प्रकरणी धीरेंद्र कृष्ण महाराज त्यांना उपलब्ध असलेल्या कायदेशीर अधिकारांसाठी मोकळे असून ते न्यायालयात दाद मागू शकतात असेही पोलीस आयुक्त म्हणाले.

### श्याम मानव काय म्हणाले?

श्याम मानव यांनी याला क्लीन चीट म्हणता येणार नाही, असं म्हटलं. पोलिसांनी जे व्हिडिओ पाहिले त्यावरुन त्यांना हा कायदा लागू होत नाही, असं वाटतं. पोलिसांचा काय निर्णय झाला विचारणार होतो पण त्यापूर्वीच त्यांनी भूमिका मांडली. राजकिय पक्षांच्या नेत्यांशी चर्चा करुन जादूटोणा प्रतिबंधक कायदा महाराष्ट्रात संमत झाला. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री आणि गृहमंत्री असताना पोलिसांचं प्रशिक्षण आयोजन करण्यात आलं होतं. कायद्यानुसार नागपूरमध्ये दिव्य दरबार झाला त्यामुळं, धीरेंद्र महाराज यांच्या वक्तव्यामुळं तो कायदा लागू होतो. या कायद्यान्वये प्रचार प्रसार करणे गुन्हा आहे. महाराजांचे जुने पुरावे आहेत त्यानुसार कायदा लागू होतो, असं श्याम मानव म्हणाले. मुंबई हायकोर्टाच्या औरंगाबाद खंडपीठानं एखादा व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीला तुझं भलं होईल अशा प्रकारचे सल्ले देत असेल तर तो जादूटोणा कायद्याच्या कलम ३/२ प्रमाणं गुन्हा लागू होतो, असं श्याम मानव म्हणाले. मुंबई हायकोर्टाच्या औरंगाबाद खंडपीठाचा यामुळं अवमान होत असल्याचं श्याम मानव म्हणाले.

---

# ...मग बाळासाहेबांना पद्मविभूषण का नाही?

### मुलायमसिंह यादवांच्या पुरस्कारावर राऊतांचा आक्षेप

✔ सुराज्य/मुंबई

**मुलायम सिंह यादव यांना दिलेल्या 'पद्मविभूषण' सन्मानावर आक्षेप घेत बाळासाहेबांना पुरस्कार का दिला नाही, यावरून शिवसेना खासदार संजय राऊत यांनी केंद्र सरकारवर आगपाखड केली आहे. ज्यांनी कारसेवकांवर गोळीबार केला. ज्यांच्यावर हिंदूंच्या हत्येचा आरोप आहे, त्यांनाच 'पद्मविभूषण' दिल्याने त्यावर आमचा आक्षेप आहे, अशा स्पष्ट शब्दांत संजय राऊतांनी पुरस्कारांविरोधात हल्लाबोल केला. शनिवारी त्यांनी प्रसिद्धी माध्यमांसोबत संवाद साधला.**

अयोध्याकांड झालं तेव्हा कारसेवकांवर मुलायमसिंह यांच्या समर्थकांकडून गोळ्या झाडण्यात आल्या. भाजपाने तेव्हा त्यांचा उल्लेख 'हिंदूंचा हत्यारा' असा केला. मुलायम सिंह यांच्यावर हिंदूंच्या हत्येचा गुन्हा दाखल



केला पाहिजे, अशी मागणी करण्यात आली होती. आत त्यांनाच 'पद्मविभूषण' देऊन गौरवण्यात आलंय. भाजपा आपल्या विचारात हळूहळू बदल करतेय, असं संजय राऊत म्हणाले.

# सरकारचा तडका पेट्रोलचा भडका



सध्या आपल्या देशामध्ये पेट्रोल-डिझेलच्या महागाईला महाघाई झाली आहे. या महाघाईमुळे महागाई दिवसेंदिवस वाढते आहे. पेट्रोल-डिझेलच्या दरवाढीची घोडदौड काही केल्या थांबायचे नावच घेईना झाली आहे. दररोज सकाळी सहा वाजता हे दर वाढलेलेच पहायला मिळतात. रुपयांनी वाढणारे हे दर कधी तरी एकदा किरकोळ पैशांनी कमी होतात. ही काय ती या महाघाईमधली क्षणिक दिलासा देणारी बाब आहे. रणरणत्या वाळवंटात सुकलेले ओॲसिस दिसावे असे त्याला म्हणता येईल. हे दर का कमी होत नाहीत? आंतरराष्ट्रीय बाजारातील कच्च्या तेलाचे दर उतरले तरी ग्राहकांना मात्र महागड्या दराचेच पेट्रोल-डिझेल का विकत घ्यावे लागते? याचे उत्तर आहे पेट्रोल-डिझेलच्या दराला केंद्र सरकार आणि राज्य सरकारने मारलेल्या कराचा तडका. हा तडका इतका कडक आहे की त्यामुळे दरवाढीचा भडका उडाला आहे.

## ओपेक राष्ट्रांची मक्तेदारी




'ऑर्गनायझेशन ऑफ द पेट्रोलियम एक्स्पोर्टिंग कण्ट्रिज' म्हणजे 'ओपेक' अर्थात जगाला कच्च्या तेलाचा पुरवठा करणाऱ्या देशांची संघटना. या संघटनेत इराक, सौदी अरेबिया यासारख्या म्हणजे बहुतांश मध्य आशियातील देशांचा समावेश होतो. सध्या भारत इराक, अमेरिका आणि सौदी अरेबिया आदी देशातून कच्चा तेलाची आयात करतो. कच्च्या तेलाचे उत्पादन किती करायचे? याचा निर्णय हा 'ओपेक' गटातील देश घेतात. म्हणजेच 'ओपेक'वाल्यांची मक्तेदारी झाली आहे. यांनी उत्पादन कमी करायचे आणि किमती वाढवायच्या असे ठरवले तर त्यांना तसे करण्यापासून रोखणारी यंत्रणा सध्या तरी अस्तित्वात नाही. ते ज्या दराने कच्चे तेल देतील; त्याच दराने ते घेण्याशिवाय दुसरा पर्याय नाही.

## असा दिला सरकारने तडका



सन २०१३ मध्ये डिलर्सना ज्या किमतीला पेट्रोल मिळत होते, त्यापेक्षा कमी किमतीला आज त्यांना पेट्रोल मिळत आहे. परंतु, केंद्र सरकार आणि राज्य सरकारने वाढवलेल्या दरांमुळे आज पेट्रोलच्या किमती २०१३ पेक्षा ३१ रुपयांनी जास्त आहेत. म्हणजेच सन २०१३ मध्ये जरी कच्च्या तेलाचे दर आजच्या तुलनेत जास्त असले तरी सरकारने त्यावर लावलेले कर २०१३ च्या तुलनेत आज जास्त आहेत. आज कच्च्या तेलाचे दर कमी असूनही पेट्रोलचे दर जास्त असण्यास सरकारने मारलेला करवाढीचा तडका हे कारण आहे. म्हणून दरवाढीचा भडका उडाला आहे.

## कच्चे तेल स्वस्त तरीही पेट्रोल-डिझेल महाग



सध्या सर्वसाधारणपणे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्चा तेलाच्या एका बॅरलची किंमत ही ६८ डॉलर इतकी आहे. हीच किंमत २००८ मध्ये १४२ डॉलर इतकी होती. सध्या एका डॉलरची किंमत ही ७४ रुपये असून हीच किंमत २००८ मध्ये ४८ रुपये इतकी होती. रुपयांचे गणित घालून पाहिले तर साधारणपणे किंमत तेवढीच आहे. मात्र २००८ च्या तुलनेत सध्या कच्च्या तेलाचे दर मात्र कमी आहेत. तरीही २००८ पेक्षा आज पेट्रोल-डिझेल महाग आहे.

## हवी प्रबळ राजकीय इच्छाशक्ती




वरील सर्व उपाययोजना या सहजपणे अमलात आणण्याजोग्या आहेत. परंतु, यासाठी प्रबळ राजकीय इच्छाशक्ती हवी, तसेच त्याचबरोबर सामान्य लोकांची साथसुद्धा मिळणे तितकेच गरजेचे आहे. पेट्रोल-डिझेलच्या किमती या सध्या १००च्या पुढे गेलेल्या असल्यातरी नजीकच्या काळात जसे कच्च्या तेलाचे दर वाढतील, तशा त्या आणखी वाढतील. पेट्रोल-डिझेलला पर्यायी मार्ग जितक्या लवकरात लवकर सापडतील, तितके भविष्य सुकर होईल इतके नक्की. सौदीसारख्या देशात आजपासून ७५ वर्षे पुरतील इतकेच तेलाचे साठे शिल्लक आहेत, जे आपल्याला माहिती आहेत. हे सर्व साठे कधी ना कधी संपणार आहेत. सक्षम पर्यायी व्यवस्था उभारणे, हाच दूरगामी उपाय आहे.

## दर कसे निश्चित होतात?

१. पहिल्यांदा 'ओपेक' राष्ट्रे कच्च्या तेलाची मूळ किंमत ठरवतात.
२. कच्चे तेल भारतात आणण्यासाठी लागणारा खर्च मूळ किमतीत मिसळला जातो.
३. कच्च्या तेलापासून पक्के तेल बनवण्याचा रिफायनरींचा खर्च
४. रिफायनरी पेट्रोलियम कंपन्यांना पक्के तेल (पेट्रोल-डिझेल) विकतात.
५. पेट्रोलियम कंपन्या तेच तेल डिलरला विकतात.
६. डिलर त्या तेलावर स्वत:चे कमीशन लावतात.
७. त्यात केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांचे कर लागतात.

हे सर्व खर्च मिसळून जो आकडा येतो; ती पेट्रोल-डिझेलची विक्री किंमत असते. अंतिमत: सर्व खर्च हा ग्राहकांकडूनच वसूल केला जातो. म्हणून ग्राहकांना पेट्रोल-डिझेल महाग मिळते.




## दरवाढीची कारणे



**१. जीएसटी :** आपल्या देशात २०१७ साली जीएसटी(वस्तू आणि सेवा कर) लागू झाला. नियमानुसार कोणत्याही वस्तूवर कमाल २८ टक्के इतका जीएसटी लावला जातो. यात केंद्र आणि राज्य सरकार यांचा निम्मा निम्मा म्हणजे प्रत्येकी १४ टक्के इतका वाटा असतो. मात्र पेट्रोल-डिझेलला सरकारने जीएसटीतून वगळले आहे. परिणामी सध्या पेट्रोलच्या मूळ किमतीच्या साधारण ११८ टक्के जास्त कर लावला जात आहे.

**२. सर्वपक्षीय असहकार :** पेट्रोल-डिझेल यांना जीएसटीच्या नियंत्रणात आणण्याचा निर्णय जीएसटी परिषदेकडून घेतला जातो. या परिषदेमध्ये सर्व पक्षीय सदस्य आहेत. अर्थातच यासाठी जीएसटी परिषदेमध्ये सर्व पक्षीय सहमती होणे अपेक्षीत आहे. मात्र कोणताही पक्ष पेट्रोल-डिझेलला जीएसटी अंतर्गत आणण्यास सध्या तरी तयार नाही.

**३. रुपयाची घसरण :** सध्या डॉलरच्या तुलनेत रुपयाची किंमत दिवसेंदिवस घसरत आहे. सन २०१३ मध्ये एका डॉलरची किंमत ४८ रुपये होती. आज तीच किंमत ७४ रूपयांपर्यंत जाऊन पोहचली आहे. कच्च्या तेलाचे व्यवहार हे डॉलरमध्ये होतात. म्हणजे डॉलरच्या तुलनेत रुपयाची घसरण झाली की कच्च्या तेलासाठी भारताला अधिक किंमत मोजावी लागते.

**४. ऑईल बाँड :** सन २००८मध्ये जेव्हा बाजार कोसळला होता, तेव्हा कच्च्या तेलाच्या किमती १४० प्रति बॅरल इतक्या चालू होत्या. वाढत्या किमतीचा भार सर्वसामान्य लोकांवर पडू नये म्हणून तेव्हाच्या सरकारने 'ओएमसी' म्हणजे ऑईल विक्री करणाऱ्या कंपन्यांना कमी दरात पेट्रोल विकण्यास सांगितले होते. त्या बदल्यात भारत सरकारने काही बॉण्ड देऊ दिले होते. त्यावेळी पेट्रोल-डिझेलच्या किमतीवर सरकारचे नियंत्रण होते. २०१४ मध्ये जेव्हा भाजप सरकार आले, तेव्हा त्यांनी पेट्रोल-डिझेलच्या किमतीवरील सरकारी नियंत्रण काढून टाकले आणि बाजारभावाप्रमाणे विक्री करण्यास कंपन्यांना परवानगी दिली. सध्या २००८ मध्ये दिलेल्या 'ऑईल बॉण्ड'चे व्याज आणि मुद्दल देण्याची जबाबदारी आता भाजप सरकारवर येऊन पडली आहे. त्यामुळे काही प्रमाणात दर वाढले आहेत.

## एक लीटर पेट्रोलची किंमत

| | सप्टेंबर २०१३ (किंमत/लिटर) | सध्याचे दर (किंमत/लिटर) |
|---|---|---|
| डिलर्सची किंमत | ५२.१५ | ४८.४२ |
| केंद्राचा कर | ९.४८ | ३२.९० |
| राज्याचा कर | १२.६८ | २२.०० |
| डिलरचे कमिशन | १.७९ | ३.६८ |
| एकूण | ७६.१० | १०७.०० |




## दर नियंत्रणात आणण्याचे उपाय

१. केंद्र सरकार आणि राज्य सरकारने एकत्र बसून वाढवलेल्या करांवर तोडगा काढून थोडे कर कमी करावेत, त्याद्वारे दर कमी होण्यास मदत होईल.
२. 'ओपेक' देशांवर फारसे अवलंबून न राहता, इतर देशांकडून जास्तीत जास्त कच्चे तेल कसे आयात करता येईल हे पाहावे.
३. सक्षम सार्वजनिक प्रवास व्यवस्था तयार करणे आवश्यक आहे. म्हणजेच नागरिक स्वत:च्या वाहनांचा वापर कमी करतील आणि पेट्रोल-डिझेलची रोजची गरज थोडीफार कमी होईल.
४. रस्त्यावरचे ट्रॅफिक कमी करणे गरजेचे आहे.त्यातून अतिरिक्त खर्च होणारे पेट्रोल-डिझेल बचत होईल.
५. सौर ऊर्जेचा वापर सुरू करणे.
६. 'बायो इंधना'चा वापर दैनंदिन वापरात वाढवणे.
७. पेट्रोलमध्ये इथेनॉलचा वापर सुरू करावा लागणार आहे. त्यासाठी इथेनॉलचे उत्पादन वाढवणे आवश्यक आहे.
८. भारतातील तेल साठवण्याची व्यवस्था वाढवणे. सध्या भारताला एकूण ७०-७५ दिवस पुरेल एवढेच तेल साठवता येते.


प्रथम पुण्यस्मरण



बु. प्रदीप विश्वनाथ कांबळे
मृत्यू दि. २९/१/२०२२

प्रदीप नावाप्रमाणे आमचा प्रकाश दीप होतास
तू जाण्याने आम्ही व्याकूळ आहोत
विजेच्या प्रकाशातही काळोख वाटतो
आज सर्वकाही असल्याची जाणीव वाटते
पण तू नसल्याची उणीव आहे
नातू पीयुष नात ग्रीशा साठी
तुझ्या प्रेमळ मायेची गरज होती
भावपूर्ण श्रद्धांजली!

•• शोकाकुल ••
पिता-आण्णा, बहीण- छाया, पुत्र-प्रणित, कन्या- प्रणाली, सून- संजीवनी
राजेंद्रकुमार कांबळे
नात्यातील समस्त परिवार